www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार २८ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### 'मी शांत बसणार नाही, सर्वांची नावं उघड करेन', पुणे पोर्शे दुर्घटनेतील आरोपी डॉ. तावरेचा इशारा

● पुणे अभिजित येरल्लू :

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये पोर्शे कारनं दिलेल्या धडकेत दोन जणांचा मृत्यू झालाय. या प्रकरणात अल्पवयीन आरोपी मुलाच्या रक्ताच्या अहवालात फेरफार केल्याप्रकरणी ससून हॉस्पिटलमधील दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे. डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर या दोन डॉक्टरांना पुणे पोलिसांनी अटक केलीय. या दोघांनाही 30 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीय. पुणे पोलिसांनी अटक करताच डॉ तावरे यांनी गंभीर इशारा दिला आहे.

'मी शांत बसणार नाही, सर्वांची नावं उघड करेल' असा इशारा डॉ. तावरे यांनी दिलाय. अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने आणि ससून हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या नमुन्यात अदलाबदल करण्यात आली याचे संकेत तावरे यांनी दिल्याची माहिती सुत्रांनी दिलीय.

पान २ वर

### लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांना सेवेत मुदतवाढ

● मुंबई, विशाल पाटील :



लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीमध्ये लष्करप्रमुखांचा कार्यकाळ 1 महिना वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतलाय. लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे 31 मे रोजी निवृत्त होणार होते. सरकारच्या नव्या निर्णयानुसार पांडे यांचा कार्यकाळ 30 जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. जनरल एम.एम. नरवणे निवृत्त झाल्यानंतर जनरल पांडे 30 एप्रिल 2022 रोजी लष्करप्रमुख बनले होते.

संरक्षण मंत्रलायानं याबाबत वक्तव्य प्रसिद्ध केलंय. त्यानुसार, 'मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं सेना नियम 1954 मधील नियम 16 ए (4) अनुसार आर्मी चिफ जनरल मनोज सी. पांडे यांच्या सेवेत 1 महिन्यांची वाढ केली आहे. ते आता 31 मे च्या ऐवजी 30 जून रोजी सेवानिवृत्त होतील. जनरल पांडे 1982 साली कोर ऑफ इंजिनिअर्स ( द बॉम्बे सॅम्पर्स) मध्ये जॉईन झााले.

पान २ वर

## डॉ. ढेरे यांना शीव रुग्णालयात येण्यास बंदी घालण्याची होतेय मागणी

● मुंबई, विशाल कारंडे :




शीव रुग्णालयाच्या परिसरात एका महिलेच्या अपघाती मृत्यू प्रकरणी शव विच्छेदन विभागाचे प्रमुख डॉ. राजेश ढेरे यांची जामिनावर सुटका झाली आहे. या प्रकरणाचे पुरावे जमा करण्यात पोलिसांना खूप त्रास झाला होता. त्यामुळे जामिनीवर असलेले डॉक्टर ढेरे यांच्याकडून सर्व पुरावे नष्ट केले जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाचा निकाल लागत नाही तोपर्यंत त्यांना रुग्णालय प्रवेशास बंदी घालावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

शीव रुग्णालयाच्या परिसरात शुक्रवारी रात्री डॉ. राजेश ढेरे यांच्या गाडीच्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला. या प्रकरणातील सीसीटीव्हीतील चित्रीकरण मिळवण्यासाठी पोलिसांना बरीच मेहनत घ्यावी लागली. अपघातानंतर १८ तासांनी डॉ. ढेरे यांनी अटक करण्यात आली होती. मात्र डॉ. ढेरे यांची जामिनावर सुटका झाली आहे. ढेरे यांचा रुग्णालयातील वावर वाढल्यास अपघातासंदर्भातील पुरावे त्यांच्याकडून नष्ट केले जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आरोपी असलेले डॉ. ढेरे यांना रुग्णालयात येण्याची बंदी घालावी आणि त्यांना कोणतीही जबाबदारी देऊ नये.

पान २ वर

## "ज्यांनी मराठा समाजावर अन्याय केला, त्यांचे नाव घेऊन त्यांना पाडल्याशिवाय सोडायचं नाही...

### निवडणुकीसंदर्भात मनोज जरांगेंच सूचक विधान

● ठाणे, यश सावंत :



लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर काही महिन्यांनी महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. असे असताना बीड लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीमध्ये जातीचं राजकारण झाल्याचा आरोप होत आहे. तसेच दोन समाजात तेढ निर्माण होत असल्याचाही आरोप होतो आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच येणाऱ्या काळात सत्तेत जाण्यासंदर्भात त्यांनी मोठं विधान केलं आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्यासंदर्भात याआधी अनेकदा सूचक विधानं केली आहेत.

"बीड जिल्हा संतांची भूमी आहे. आमच्या महाराष्ट्रात आणि बीड जिल्ह्यात असं कधी झालं नाही. आम्ही कधीच म्हणणार नाही की एखाद्या समाजाच्या दुकानात जाऊ नका. असे विचार आम्ही ठेवणार नाहीत. जातीय तेढ निर्माण व्हायला काय झालं? १३ तारखेपर्यंत मतदान होईपर्यंत मराठे चांगले होते.

पान २ वर

## डोंबिवली एमआयडीसीतील स्फोटाने नुकसान झालेल्या ९४१ मालमत्तांचे पंचनामे



● डोंबिवली, भावना जैन :

डोंबिवली येथील एमआयडीसीतील अमुदान कंपनी स्फोटामुळे नुकसान झालेल्या एक ते दोन किलोमीटर परिसरातील कंपन्या, हॉटेल्स, इमारती, घरे अशा एकूण ९४१ मालमत्तांचे पंचनामे करण्यात आले आहेत. या पंचनाम्यांचा सविस्तर अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात येईल, अशी माहिती कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळे यांनी दिली. अनेक मृतदेहांची ओळख पटत नसल्याने पोलिसांनी शास्त्रीनगर रुग्णालयाच्या माध्यमातून बेपत्ता कामगारांच्या नातेवाईकांचे रक्ताचे नुमने घेऊन ते फोरेन्सिक प्रयोगशाळा आणि डीएनए चाचणीसाठी पाठविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

पान २ वर

अमुदान कंपनी स्फोटामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी एकूण २५ तलाठी नेमण्यात आले होते. कंपनी परिसरातील नुकसान झालेल्या मालमत्ता, आस्थापना यांचे एकूण ९४१ पंचनामे करण्यात आले आहेत.

**-सचिन शेजाळे, तहसीलदार, कल्याण.**

## तृणमूल काँग्रेसविरोधातील जाहिरातींच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा भाजपाला दणका

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



सर्वोच्चन्यायालयानेतृणमूलकाँग्रेसविरोधातील (टीएमसी) जाहिरातींच्या प्रकरणात भारतीय जनता पार्टीला दणका दिला आहे. याप्रकरणी भाजपाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायालयाने म्हटलं आहे की, "प्रथमदर्शनी तुमच्या जाहिराती चुकीच्याच आहेत". कोलकाता उच्च न्यायालयाने भाजपाच्या तृणमूलविरोधातील याचिकांवर बंदी घातली होती. उच्च न्यायालयाने भाजपाला सक्त आदेश दिले आहेत की "तुम्ही तृणमूलविरोधात बनवलेल्या जाहिराती ४ जूनपर्यंत (लोकसभा निवडणुकीच्या निकालापर्यंत) प्रसारित करू नका". त्यानंतर भारतीय जनता पार्टीने कोलकाता उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. आता सर्वोच्च न्यायालयानेही भाजपाला खडसावलं आहे. न्यायालयाने भाजपाला म्हटलं आहे की, "तुमचा प्रतिस्पर्धी हा तुमचा शत्रू नसतो."

भाजपाचे वकील पी. एस. पटवालिया यांनी सर्वोच्च न्यायालयाला म्हटलं होतं की, "आमच्या जाहिराती या तथ्यांवर आधारित आहेत". यावर न्यायमूर्ती जितेंद्र महेश्वरी म्हणाले, "तुम्ही त्यांच्या (टीएमसी) याचिकेतील मुद्दे पाहा. तुमच्या जाहिरातींमधून तुम्ही अनेक मुद्दे मसाला लावून सादर केले आहेत.

पान २ वर

## नागपुरातील उद्योगांमध्ये अग्निशमन यंत्रणा सक्षम नसल्याचे अग्निशमन विभागाच्या सर्वेक्षणातून वास्तव आलं समोर



● नागपूर, नितीन देवळेकर :

एमआयडीसीसह शहरातील विविध भागात असलेल्या ६६५ उद्योगांपैकी २१९ उद्योगांमध्ये अग्निशमन यंत्रणा सक्षम नसल्याचे अग्निशमन विभागाने केलेल्या सर्वेक्षणातूनच वास्तव समोर आले आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील इमारतींच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.उन्हाचा तडाखा वाढत असल्याने आगीच्या घटना घडत आहेत. दोन दिवसांपूर्वी हिंगणा एमआयडीसी येथे शाई तयार करणाऱ्या कंपनीला आग लागून त्यात कोट्यवधींचे नुकसान झाले. यानंतर अग्निशमन केंद्र आणि महापालिकेने अशा कंपन्यांच्या अग्निशमन यंत्रणेची तपासणी केली व जिथे यंत्रणा सक्षम नाही त्यांना नोटीस देणे सुरू केले. बुटीबोरी, एमआयडी हिंगणा व वाडी या भागात उद्योगांची संख्या बघता अतिरिक्त फायर टेंडरची गरज समोर येऊ लागली आहे. यापूर्वी हिंगणा एमआयडीसीतील कटारिया ॲग्रो कंपनीला आग लागली होती. त्यात युनिटचे प्रचंड नुकसान झाले. त्यापूर्वी बुटीबोरी औद्योगिक वसाहतीमधील स्पेसवूड, नितिका फार्मा आदी कंपन्यांना आग लागली. अमरावती मार्गावरील एका लॉजिस्टिक पार्कलाही मोठी आग लागली होती. उन्हाळ्याच्या दिवसात आग लागण्याचे प्रमाण अधिक असते. परंतु, बुटीबोरी आणि हिंगणा एमआयडीसीत अग्निशमन यंत्रणा सक्षम नाही. येथील युनिटधारक अग्निशमन सेवा वाढवण्याची मागणी करत असले तरी अतिरिक्त फायर टेंडर पुरवण्यात आलेले नसल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, शहरातील एमआयडीसीमधील कंपनीत अग्निसुरक्षा यंत्रणा बंधनकारक असल्यामुळे या प्रिंटिंगची शाई तयार असलेल्या कंपनीत अग्निशमन यंत्रणा होती की नाही याबाबत महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून तपास केला जाणार आहे.

पान २ वर

उद्योगाच्या इमारतींमधील बंद पडलेली किंवा नादुरुस्त असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात पत्र देण्यात आले आहे. ज्या उद्योगांमध्ये यंत्रणा नाही त्यांनी तात्काळ यंत्रणा बसवणे गरजेचे आहे.

**– बी.पी. चंदनखेडे, अग्निशमन अधिकारी, महापालिका**

## अमूदान स्फोट प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार कामगार मंत्री सुरेश खाडे यांचे आश्वासन

● डोंबिवली, रोहित जैसवाल :



डोंबिवली एमआयडीसीतील अमूदान या रासायनिक कंपनीत झालेल्या स्फोट प्रकरणी दोषी अधिकारी वर्गाच्या विरोधात कारवाई केली जाईल, असे आश्वासन कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिले आहे. अपघातग्रस्त अमूदान कंपनीच्या ठिकाणी कामगार मंत्री खाडे यांनी सोमवारी दुपारी भेट दिली. या वेळी त्यांनी कंपनी परिसराची पाहणी केली. कामगार मंत्री खाडे यांनी सांगितले की, कंपनीतील रिॲक्टरमुळे हा स्फोट झाला आहे. हे प्रथमदर्शनी आढळून येते. त्याठिकाणी बॉयलरचा काही संबंध नाही. कंपनतीली रिॲक्टर कसा आणि का फुटला याची चौकशी केली जाणार आहे. या चौकशीत अधिकारी दोषी आढळून आल्यास त्यांच्या विरोधात कारवाई केली जाणार आहे. या स्फोटात १० जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६४ जण जखमी झाले आहे. मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखाची मदत आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करणार आहे. हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आधीच जाहीर केले आहे. जे कामगार मृत या स्फेटात मृत्यूमुखी पडले. त्यांचे वय आणि त्यांची कंपनीतील सेवा वर्षे याची माहिती घेऊन कंपनी मालकाकडून त्यांना त्यांचे लाभ देण्यासाठी कामगार आयुक्त विभागाकडून आदेशित केले जाणार आहे. स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की त्याठिकाणी एक मोठा खड्डा पडला आहे. तसेच आसपासच्या सात कंपन्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्या कंपन्यातील कामगारही मृत्यूमुखी तर काही जखमी झाल्याची माहिती आहे .

अपघातग्रस्त अमूदान कंपनीचे सेफ्टी ऑडिट करण्यात आले होते का ? हा प्रश्न खाडे यांना विचारला असता त्यांनी सांगितले की, सेफ्टी ऑडिट झाले होते असे त्यांनी सांगितले. मात्र झाले होते की नाही ते तपासले जाईले असेही ते म्हणाले. दर दोन वर्षांनी कंपन्यांचे सेफ्टी ऑडिट केले जाते. त्यात काही त्रूटी आढळून आल्यास त्या त्रूटी दूर करण्सास सांगितले जाते.

त्या त्रूटी दूर केल्या नाही तर त्यांच्या विरोधात कारवाई केली जाते. सेफ्टी ऑडिटची प्रक्रिया सुरु असते. आत्ता अमूदान कंपनीतील स्फोटाच्या घनटेनंतर पुन्हा कंपन्यांनी सेफ्टी ऑडिट केले गेले आहे की नाही हे तपासले जाईल. डोंबिवलीतील १५६ कंपन्या धोकादायक आहेत. त्या अन्यत्र हलविण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारच्या काळात घेतला होता. त्याचे पुढे काय झाले याची विचारणा खाडे यांच्याकडे केली असता त्यांनी सांगितले की, धोकादायक कंपन्या अन्यत्र हलविण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. मात्र कंपन्या अन्यत्र हलविणे कंपनी मालकांना सोयस्कर आहे की नाही हे देखील जाणून घेतले जाणार आहे.

## बदलत्या हवामानामुळे मासेमारी व्यवसाय खातोय 'हेलकावे'

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



रत्नागिरी जिल्ह्यात आंबा, शेती या दोन व्यवसायाबरोबरच मासेमारी हाही एक प्रमुख व्यवसाय आहे. जिल्ह्याला लाभलेल्या विशाल समुद्र किनाऱ्यामुळे मासेमारी व्यवसाय वृद्धिंगत होत आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत सातत्याने हवामानात होणाऱ्या बदलाचा परिणाम मासेमारीवर होत आहे.

चांगले उत्पन्न मिळवून देणारा हा व्यवसाय आता हवामानाच्या तडाख्यात सापडला आहे. वारंवार होणारी वादळे, अवकाळी पाऊस यामुळे मासेमारी व्यवसायच बंद होण्याची भीती व्यक्त होत आहे. मागील १० वर्षांची आकडेवारी पाहता मत्स्य उत्पादन निम्म्यावर आले आहे. मात्र, गतवर्षीच्या मोसमापेक्षा यंदाच्या मौसमात बऱ्यापैकी मासेमारी झाली असून, त्यातच पर्ससीन मासेमारीला चांगले दिवस असले तरी फार वर्षांपासून ट्रॉलिंग पद्धतीने सुरु असलेल्या मासेमारीचे भवितव्य अंधकारमय आहे. ट्रॉलिंग मासेमारी करणाऱ्या नौकांच्या संख्येत दरवर्षी घट होत चालल्याने मच्छीमारांची चिंता अधिक वाढत चालली आहे. ट्रॉलिंग मासेमारी करणाऱ्या नौकांचा व्यवसाय डबघाईला आला आहे. त्यातच मासे मिळण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झाल्याने, या नौका मालकांचा डिझेलचा खर्च निघत नसेल तर खलाशांचा खर्चही भागवता येत नाही. त्यामुळे खलाशांचे पलायन नौका मालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

पान २ वर

■ वेळोवेळी समुद्रात होणारे वातावरणातील बदल, समुद्रातील प्रदूषण आणि मार्शाचे प्रमाण पूर्ववीपेक्षा कमी, यामुळे मासेमारी व्यवसायाला धोका निर्माण झाला आहे. भविष्यात हा व्यवसाय टिकेल की नाही, असाही प्रश्न मच्छीमारांसमोर उभा राहिला आहे. जिल्ह्यात पर्ससीन नेट मासेमारी व्यवसायाला चांगले दिवस आलेले असले तरी ट्रॉलिंग मासेमारी हळूहळू कमी होत चालली आहे.

■ ट्रॉलिंग मासेमारीला तारण्यासाठी शासनाने त्यासाठी ठोक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी बेकायदेशीर एलईडी द्वारे चालणारी मासेमारी तसेच ठराविक अंतर सोडून बेकायदेशीरपणे घुसखोरी करून मासेमारी करण्यावर प्रतिबंध लावण्यात आलेला असला तरी त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

## आधी जे घडलं ते पुन्हा नको म्हणून २००४ ला CM पद नाकारलं

### अजित पवारांचा दावा



● मुंबई, सचिन कदम :

२००४ साली जर राष्ट्रवादीला मुख्यमंत्री पद मिळालं असतं तर आजपर्यंत ते कायम राहिलं असतं. आता शरद पवार जे सांगतायेत ते धादांत खोटे आहे. मुख्यमंत्रिपद न घेण्यामागे काही ना काही कारण आहे असं सांगत अजित पवारांनी मोठा दावा केला आहे.

मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक पार पडली. यात अजित पवारांनी सांगितलं की, २००४ बद्दल शरद पवारांनी काही विधान केले, त्यावेळी जर राष्ट्रवादीचा मुख्यमंत्री केला असता तर पक्ष फुटला असता असं ते बोलले. परंतु हे धादांत खोटे आहे. मी त्यावेळी होतो, राष्ट्रवादीचा मुख्यमंत्री व्हावा हे आम्हाला वाटत होतं. त्यावेळी मला मुख्यमंत्रिपदात रस नव्हता. छगन भुजबळ हे मुख्यमंत्री होतील असं वाटत होतं, पक्ष स्थापनेपासून भुजबळांनी गावोगावी जात संघटना वाढवण्याचं काम केलं होतं. त्या काळात इतकं वातावरण निर्माण होऊनही राष्ट्रवादीला ५८ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर २००४ मध्ये काँग्रेसपेक्षा जास्त जागा राष्ट्रवादीला मिळाल्या होत्या असं त्यांनी सांगितले.

तसेच १९९१ शरद पवारांना संरक्षण मंत्री केंद्रात जायची वेळ आली तेव्हा बहुतांश आम्ही सगळे काँग्रेस आमदार सेवासदनला बसले होते. तेव्हा एकत्र काँग्रेस होती. आमदारांच्या बैठकीत पद्मसिंह पाटलांचं नाव पुढे आलं होतं, त्यावेळी सुधाकरराव नाईकांचं नावही चर्चेत नव्हतं.

पान २ वर

# संपादकीय

## रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचे काय?

मुंबईतील रेल्वेची लोकल सेवा ही मुंबईकरांची जीवनवाहिनी आहे, लोकल गाड्यांना अगदी अवघ्या काही मिनिटांसाठी उशीर झाला तर फलाट किती तुडुंब गर्दीने ओसंडून वाहतात ते आपण पाहत असतो. लोकल गाड्यांमधून प्रवास हा सामान्य माणसांना परवडणारा असतो, तसेच लांब पल्ल्याचा प्रवास हा रस्ते मार्गाने करणे वेळेच्या आणि पैशाच्या दृष्टीने सोयीचे नसते, त्यामुळे बहुतांश मुंबईकर लोकलमधून प्रवास करत असतो. लोकल गाड्यांचे काय महत्व आहे, ते कोरोनामध्ये लोकल गाड्या बंद ठेवण्यात आल्या होत्या तेव्हा दिसून आले. लोकल गाड्यांवर मुंबईकरांचे भवितव्य अवलंबून असते. या देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक त्यात विशेषत: तरुण वर्गाचा प्रामुख्याने समावेश असतो, ते मुंबईमध्ये येत असतात. काही तरुण आपल्या गावातून उच्च शिक्षणासाठी तर काही नोकरीसाठी येत असतात. कारण गावाच्या ठिकाणी रोजगारांची साधने नसतात, त्यामुळे ते गावाकडील आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मुंबईची वाट धरतात. मुंबईत येणाऱ्या या गरीब तरुणांना स्वत:चे घर घेणे तर अवघड असते, त्यामुळे कुणा नातेवाईकाकडे राहतात, नाही तर मुख्य मुंबईपासून दूर असलेल्या उपनगरांमध्ये भाड्याने जागा घेऊन राहतात. अशा या तरुणांच्या आयुष्याचे पाच तास तर नुसते प्रवासातच निघून जातात. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे तिथे गेल्यावर आपल्याला काही तरी रोजगार मिळेल, गावाकडे असलेल्या आपल्या कुटुंबाला पैसे पाठवता येतील, असे या तरुणांना वाटत असते. त्यामुळे मुंबईत मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते, लोक मिळेल तिथे जागा करून राहतात. या सगळ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी पोहोचविण्याचे काम लोकल करत असते. लोकलचा वापर सगळयात जास्त होत असल्यामुळे लोकलच्या अपघातांचे प्रमाणही मोठे आहे. त्यामध्ये बळी जाणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

लोकलने प्रवास करताना काय काळजी घ्यावी याच्या उद्घोषणा वारंवार होत असतात, पण घरातून निघाल्यानंतर कामाची वेळ काढून लेटमार्क लागू नये, म्हणून नोकरदाराची धावपळ सुरू असते. तसेच पुन्हा कामावरून सुटल्यानंतर घरी पोहोचण्यासाठी त्याची धावपळ सुरू असते. मुलांना शाळेतून किंवा ट्युशनवरून आणायचे असते, अशा अनेक विवंचना या नोकरदारांच्या डोक्यात असतात. त्यामुळे बरेचदा कानावर काळजी घेण्याच्या उद्घोषणा येत असल्या तरी त्याच्या मनात अनेक विचारांचे काहूर माजलेले असते. त्यामुळे त्याचे दुर्लक्ष होते, त्यामुळे त्याला अपघाताला सामोरे जावे लागते, काही वेळा मृत्यूही होतो. मोठ्या आशेने अनेक स्वप्ने घेऊन गावाहून मुंबई गाठणाऱ्या काहींचे स्वप्न भंग होते. त्यामुळे लोकल जशी जीवनवाहिनी आहे तशीच ती काही प्रसंगी जीवघेणी ठरत असते. लोकल अपघातात मागील महिनाभरात किती बळी गेले किंवा मागील वर्षभरात किती जणांना जीव गमवावा लागला, ही आकडेवारी धक्कादायकच असते. त्यामुळे त्यातून मार्ग काढता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. रेल्वेची गर्दी कमी व्हावी आणि लोकांना प्रवास करणे सुसह्य व्हावे यासाठी कार्यालयांच्या वेळा बदलण्याचा पर्याय सूचवण्यात आला होता, पण त्याला काही फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मुंबईत डबल डेकर लोकल गाड्या चालवाव्यात, असेही काही जण सूचवतात, पण त्यामुळे फलाटांवर इतकी गर्दी होईल की, त्या चेंगराचेंगरीत अनेकांचे जीव जाण्याची शक्यता आहे. लोकलमधील गर्दीवर तोडगा काढण्यासाठी मेट्रो, भुयारी रेल्वे, मोनो रेल असे पर्याय पुढे आणले जात आहेत, तरीही मुंबईतील गर्दी कमी होण्याचे नाव घेत नाही. याला अन्य राज्यांमधून मुंबईत येणारे लोंढे हे कारणीभूत आहेत. त्याचसोबत इथे उपलब्ध होणारा रोजगारदेखील या माणसांना मुंबईत आकर्षित करत असतो. मुंबई आणि परिसरात गगनचुंबी टॉवर्स उभारले जात आहेत, ते उभारण्यासाठी हजारो कामगारांची गरज असते. रात्रंदिवस चालणाऱ्या या बांधकामांवर यातील बहुतेक लोक काम करत असतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील निसोबाचा सडा येथील एका गरीब शेतकरी कुटुंबातील युवक जगन जंगले हा आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मुंबईला आला. कल्याण पूर्व येथे भाड्याच्या घरात राहत होता.



### आजची चित्रोळी

हवे कशाला वेगळे तोरण
हवा कशाला हार !
स्वागतास हे सदैव तत्पर
करी आदरसत्कार !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### डॉ. ढेरे यांना शीव रुग्णालयात.....

अन्यथा पुरावे नष्ट होण्याची शक्यता मुंबई महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी वर्तवली आहे.

अपघातात मृत्यू झालेली महिला ही गरीब कुटुंबातील असल्याने तिच्या कुटुंबियांना न्यायाची प्रतीक्षा आहे, या विषयांत निष्पक्ष आणि कुठल्याही दबावाशिवाय चौकशी व्हावी, तसेच पोलिसांना सर्व पुरावे वेळेत मिळावेत यासाठी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हायला हवी अशी विनंती रवी राजा यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

### "ज्यांनी मराठा समाजावर अन्याय केला...

१३ तारीख संपली की मराठे वाईट झाले. निवडणुकीत मराठ्यांनी तुमचं काम केलं नाही का? मराठ्यांनो मी तुम्हाला हात जोडून सांगतो, शांत राहा. आपण फक्त पाहायचं कोण काय करतंय. एक महिनाभर चुका करूद्या, आपण शांत राहा", असं मनोज जरांगे म्हणाले. मात्र, त्यांच्या या विधानाचा रोख कुणाकडे होता? याबाबत आता तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.

ते पुढे म्हणाले, "आमचं आंदोलन मोडण्याची कोणाचीही टप्पर नाही. आंदोलन हा संविधानाने दिलेला एक हक्क आहे. काहीजण राजकीय हितापोटी जातीय तेढ निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असून आम्ही आमच्या हक्कासाठी लढत आहोत. आम्ही शांत आहोत, आम्हाला शांत राहूद्या. जातीय तेढ निर्माण होऊ नये, असं आवाहन बीड जिल्ह्यातील सर्व मराठा बांधवांना करतो. त्यांच काम होईपर्यंत ते सगळयांच्या पाया पडले. मात्र, शेवटी एक पर्याय आहे. अन्याय बंद करायचा असेल आपल्याला सत्तेत जावं लागणार आहे", असं मोठं विधान मनोज जरांगे यांनी केलं.

४ जूनच्या उपोषणावर ठाम..

"ज्यांनी मराठा समाजावर अन्याय केला, त्यांच्या विरोधात उमेदवार द्यायचा नाही, पण नाव घेऊन त्यांना पाडल्याशिवाय सोडायचं नाही", असं म्हणत ४ जूनच्या उपोषणावर आपण शंभर टक्के ठाम आहोत. माझ्या समाजाच्या न्यायाचा विषय असून राज्य सरकारने आम्हाला दिलेल्या शब्दाला आज पाच महिने होऊन गेले आहेत. मग राज्य सरकारला अजून किती दिवस पाहिजेत?",असंही मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

### डोंबिवली एमआयडीसीतील स्फोटाने...

आपल्या बेपत्ता कामगाराची अद्याप ओळख पटत नसल्याने आणि त्याचा शोध लागत नसल्याने अनेक कामगार कुटुंबीय शोकाकूल आहेत. आमच्या कामगारांचा शोध लावून द्या, असा दबाव या कुटुंबीयांकडून तपास यंत्रणांवर वाढत आहे.

अमुदान स्फोट प्रकरण तपासात कोणतेही कच्चे दुवे राहू नयेत म्हणून रासायनिक तज्ज्ञ आणि कंपनीशी संबंधित इतर तज्ज्ञांचे सहभाग आणि त्यांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. याशिवाय फॉरेन्सिक प्रयोगशाळेतील तज्ज्ञ, औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयातील अधिकारी यांचेही मार्गदर्शन घेतले जात आहे. सबळ पुरावे या प्रकरणात आरोपींविरुध्द गोळा करून हे प्रकरण न्यायालयात सादर करण्यापूर्वी भक्कम केले जात आहे. कंपनी स्थळावरून विविध प्रकारचे रासायनिक आणि अन्य नमुने गोळा केले जात आहेत, असे या प्रकरणातील तपास अधिकारी उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस अधिकारी अशोक कोळी यांनी सांगितले.

या स्फोट प्रकरणातील मुख्य आरोपी मलय मेहता याच्या घरातून कंपनी, उत्पादन निगडित काही महत्वाची कागदपत्रे तपास पथकाने ताब्यात घेतली आहेत. या कागदपत्रांचे आधारे, परवाने, नुतनीकरण आणि त्याप्रमाणे कंपनीतील उत्पादन प्रक्रिया सुरू होती का हे तपासले जाणार आहे. या कंपनीतील बाष्पकला परवानगी नसल्याचे बाष्पक विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे या अनुषंगाने तपास केला जाणार आहे, असे कोळी यांनी सांगितले.

अमुदान आणि लगतच्या सप्तवर्ण, कॉसमॉस केमिकल कंपनीतील एकूण नऊ कामगार अद्याप बेपत्ता आहेत. बचाव कार्य करताना कामगारांचे विविध अवशेष सापडतात. ते एकत्रित करून शास्त्रीनगर रुग्णालयात पाठविण्यात येतात, असे पालिका अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले.

मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी आठ कुटुंबीयांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत. याशिवाय स्फोटातील मृतदेहांच्या विविध अवेशषांचे नुमने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. कलिना येथील फॉरेन्सिक प्रयोगशाळेत ते तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत, अशी माहिती शास्त्रीनगर रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुहासिनी बडेकर यांनी दिली. आतापर्यंत १८ विविध प्रकारचे नमुने फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. जसे विविध अवयव बचाव पथकाकडून रुग्णालयात येतात. त्याप्रमाणे ते नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत पाठविले जातात, असे डॉ. रुक्मिणीबाई रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम टिके यांनी सांगितले.

### तृणमूल कॉंग्रेसविरोधातील जाहिरातींच्या...

आम्ही कोलकाता न्यायालयाच्या निकालात हस्तक्षेप करण्यास इच्छूक नाही." यावर पटवालिया म्हणाले, "तिथे (कोलकाता उच्च न्यायालयात) आमचं म्हणणं ऐकूनच घेतलं गेलं नाही. किमान माझा युक्तिवाद तरी ऐकून घ्या." यावर न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन म्हणाले, "प्रथमदर्शनी तुमच्या जाहिराती खूप अपमानकारक आहेत."

न्यायालयाने या प्रकरणावर म्हटलं आहे की, "राजकीय कटुता वाढत चालली आहे आणि आम्ही त्यास प्रोत्साहन देऊ इच्छित नाही. अर्थात तुम्ही तुमच्या जाहिराती नक्कीच करू शकता. उच्च न्यायालय तुमचं म्हणणं ऐकून घेत असेल तर आम्ही त्यात आडकाठी करणार नाही." यावर वकील पटवालिया म्हणाले, "१ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदान होणार आहे. त्यामुळे तुम्ही आमचं म्हणणं ऐकून घ्यावं." यावर न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन म्हणाले, "अशा जाहिराती तुम्ही करत राहिलात तर त्याचा मतदारांना काहीच फायदा होणार नाही. याचा केवळ तुम्हालाच फायदा होणार आहे."

न्यायमूर्तींनी भाजपाला खडसावलं

न्यायमूर्ती जितेंद्र महेश्वरी म्हणाले, "हा खटला येथे (सर्वोच्च न्यायालयात) चालवू नये. कोलकाता उच्च न्यायालयाने याप्रकरणी उचित निकाल दिलेला असताना या अनावश्यक बाबींची गरज नाही. आम्ही तुम्हाला निवडणूक लढू नका असं म्हणालो नाही. मात्र यात हस्तक्षेप करण्यास आम्ही इच्छूक नाही. तसेच इथे एक गोष्ट नमूद करणं आवश्यक आहे की, तुमचा प्रतिस्पर्धी हा तुमचा शत्रू नसतो."

### नागपुरातील उद्योगांमध्ये अग्निशमन यंत्रणा...

गेल्या सहा महिन्यात एमआयडीसीमधील छोट्या मोठ्या सात कंपनीमध्ये आगीच्या घटना घडल्याचे समोर आले असून त्यातील अनेक कंपनीमध्ये अग्निसुरक्षेच्या दृष्टीने यंत्रणा कमकुवत असल्याचे समोर आले होते.

एमआयडीसी अग्निशमन विभागाने अशा कंपनीला नोटीस देत बंद असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याचे आदेश दिले होते मात्र त्यानंतरही अनेक कंपन्यानी दुर्लक्ष केले आहे. महापालिकेने शहराच्या बाहेर आणि शहरात असलेल्या निवासी इमारतीमध्ये असलेल्या छोटे उद्योगामध्ये अग्निशमन यंत्रणा आहे की नाही याबाबत सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या काही दिवसात शहरात उन्हाचा तडाखा वाढत असताना आगीच्या घटना वाढल्या आहे. गेल्या आठ दिवसात शहरात आगीच्या आठ ते दहा घटना घडल्या असून महापालिकेच्या अग्निशमन विभागाने कमी मनुष्यबळ असताना त्यावर नियंत्रण मिळवले आहे.

### बदलत्या हवामानामुळे मासेमारी व्यवसाय...

गेल्या दहा वर्षात भासे मिळण्याचे प्रमाण कमी झालेले असतानाच वातावरणातील बदलाचा परिणामही मासेमारीवर झालेला आहे. प्रत्येक आठवड्याला अचानक निर्माण होणाऱ्या वादळमय स्थितीमुळे मासेमारी बंद तेयाची लागते. नौका किनाच्द्यावर बंदरात नांगरावर ठेवाव्या लागत असल्याने मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे अनेकदा डिझेलचा खर्च, खलाशांचे मानधन, कर्जाचे हप्ते भागवता येत नाहीत. त्यामुळे अनेक मच्छीमार नौका बंद झालेल्या आहेत.

सर्वच स्थानिक मच्छीमार समुद्रात मासेमारीसाठी जात नाहीत. हातामध्ये कला असलेले काही मच्छीमार जाळी विणण्याचे कामही करतात, पर्ससीन मासेमारी बंद झाली, तरी पर्ससीन नेटवर आजही शेकडो लोकांचे पोट भरले जात आहे. मासेमारी करताना पर्ससीन नेट ही जाळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यासाठी या जाळीची दुरुस्ती करण्यासाठी स्थानिक मच्छीमारांनाच काम दिले जाते. सुमारे ५०० रुपये एका दिवसाची रोजंदारी जाळी दुरुस्तीचे काम करणाऱ्यांना दिली जाते. हे काम केवल मासेमारी हंगामातच नव्हे, तर पावसाळयातही सुरु असते.

### आधी जे घडलं ते पुन्हा नको म्हणून २००४...

सुधाकरराव नाईक यांच्या हाताखाली आम्ही सगळयांनी काम केले. केंद्रात जाताना शरद पवारांनी पद्मसिंहांना खुर्ची न देता नाईकांना पुढे आणलं आणि सरकार बनवलं. १९९१ नंतर १३-१४ वर्षांनी अशी संधी आली होती तेव्हा कुणी नवखे होते हे म्हणायचं कारण नव्हतं. पण आता काहीपण सांगतायेत असंही अजित पवारांनी म्हटलं.

दरम्यान, नाईकांना मुख्यमंत्री केल्यानंतर त्यांनी १ वर्षही साहेबांचं ऐकलं नाही. १७ लोकांना आम्हाला मंत्रिमंडळातून काढलं. तिथून सगळी गडबड झाली. २००४ ला कदाचित हा विचार शरद पवार-प्रफुल पटेल यांच्यात झाला असेल की, १९९१ ला मुख्यमंत्री करून एक वर्षात कुणी ऐकलं नाही आता जर मुख्यमंत्री केले तर आपल्या दोघांना कायम दिल्लीला पाठवतील. त्यामुळे मुख्यमंत्री पद घेतले नसेल. काही ना काही कारण आहे. २००४ ला मुख्यमंत्रिपद घेतले असते तर तिथून कायम राष्ट्रवादीचा मुख्यमंत्री राहिला असता असा दावा करत अजित पवारांनी आपण पुन्हा जोमाने कामाला लागू. युद्धात आणि तहात दोन्हीत जिंकू असं आवाहन कार्यकर्त्यांना केले

### 'मी शांत बसणार नाही, सर्वांची नावं उघड...

अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यात अदलाबदल करण्यात आल्याची माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्या माहितीच्या अधारे डॉ. तावरे, डॉ. हरलोर आणि या प्रकरणातील मध्यस्थ अतुल घटकांबळे या तिघांना अटक केलीय. या सर्वांना 30 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीय.

### लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांना सेवेत...

ते एप्रिल 2022 मध्ये आर्मी चिफ होण्यापूर्वी पहिले 'व्हॉईस चीफ ऑफ द आर्मी स्टाफ' या पदावर कार्यरत होते.

सरकारच्या या निर्णयामुळे नवे लष्करप्रमुख कोण होणार? हा सस्पेंस वाढला आहे. जनरल पांडे यांचा कार्यकाळ 1 महिना वाढवण्यात आलाय. त्याचा पुढील लष्करप्रमुखांच्या निवडीवर परिणाम होईल, असं मानलं जातंय. वर्तमान सह सेना लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी या पदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी 30 जून रोजी निवृत्त होत आहेत. त्याचबरोबर लष्कराचे दक्षिण कमांड प्रमुख लेफ्टनंट जनरल ए.के. सिंह देखील 30 जून रोजी निवृत्त होणार आहेत. त्यामुळे नवे लष्करप्रमुख कोण होणार? ही चर्चा सुरु झाली आहे. लेफ्टनंट जनरल द्विवेदी आणि लेफ्टनंट जनरल सिंह हे एकाच बॅचचे आहेत.

# पावसाळ्यात साजरे होणारे गोव्यातील सण

बहावा वृक्ष बहरला की पावसाचं आगमन झालंच म्हणून समजा. गोव्यातल्या पावसाची तर मजाच न्यारी. फेसाळणारा समुद्र, हिरवागार शालूने जणू नटलेला निसर्ग, यामध्ये भर पडते ती इथल्या सणांची. विविध संस्कृतींचे दर्शन घडविणारे गोव्यातील सण हे इथल्या मान्सूनचं खरं आकर्षण असतं असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही, या लेखात आपण पावसाळ्याचा आनंद द्विगुणीत करणाऱ्या अशा काही सणांची माहिती घेऊ.

सांजाव महोत्सव:

गोव्यातील सर्वात लोकप्रिय मान्सून उत्सवांपैकी एक म्हणजे सांजाव महोत्सव. हा उत्सव राज्यभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सेंट जॉन द बॅप्टिस्टच्या नावावरून साजरा केला जाणारा हा सण जल केंद्रित आहे. विहिरी, नद्या आणि तलावांमध्ये उडी मारून जलक्रीडा करत हा सण साजरा केला जातो.

सांजाव महोत्सव दरवर्षी 24 जून रोजी गोव्यात साजरा केला जातो. पाण्यात तरंगणारे रंगीबेरंगी फ्लोट्स, पारंपारिक संगीत, स्थानिक लोक आणि पर्यटक एकसारखे दिसणारे कोपल्स (फुलांची माळा) घालतात, यामुळे उत्सवाच्या उत्साहात भर पडते.

सांगोड उत्सव:

मान्सून उत्सवाला सुरुवात करणारा सांगोड उत्सव, गोव्यातील मासेमारी करणाऱ्या समुदायाद्वारे साजरा केला जाणारा पारंपारिक बोट उत्सव आहे. दरवर्षी, 29 जून रोजी, गोव्यात



सेंट पीटर आणि सेंट पॉल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा केला जातो. सेंट पीटरचं या समुदायामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सणापासूनच 'रॅम्पन' मासेमारीच्या हंगामाची सुरूवात होते, आपल्या लाडक्या दर्या राजाचे आशीर्वाद घेतले जातात, विधीवत पूजा करून पुढील वाटचालीसाठी बोटी तयार केल्या जातात.

छोट्या नाव एकत्र आणून त्या एकमेकांसोबत जोडल्या जातात. नारळाच्या झावळ्या, फुले आणि रंगीबेरंगी फुग्यांनी या छोट्या नावांना सजवले जाते. चर्चची प्रतिकृती या नावेच्या मध्यभागी उभारली जाते. यावेळी हा मच्छीमार करणारा समुदाय आपल्या पारंपारिक लोकनृत्याने, संगीताच्या सादरीकरणाने प्रेक्षकांचे मनोरंजन करतात.

चिखल कालो महोत्सव:

"द मड फेस्टिव्हल" म्हणून ओळखला जाणारा धार्मिक सण, गोव्यात पावसाळ्यात विशेषत: जूनमध्ये साजरा केला जाणारा पारंपारिक उत्सव आहे. पोंडा येथील मार्सेल गावातून उगम पावलेला, हा अनोखा उत्सव देवकी कृष्ण मंदिरास केंद्रस्थानी ठेवून साजरा केला जातो. हा उत्सव भगवान कृष्ण आणि त्याची आई देवकी यांना समर्पित आहे.

सणाची नेमकी उत्पत्ती अस्पष्ट असली तरी, गावकरी दरवर्षी मोठ्या उत्साहाने त्याचे स्मरण करतात. या उत्सवात सहभागी आनंदाने चिखलात लोळतात आणि पारंपारिक खेळांमध्ये मंत्रमुग्ध होऊन जातात. देवकी कृष्ण मंदिराशेजारी असलेले मैदान उपस्थितांचे स्वागत करत गर्दीच्या रिंगणात रूपांतरित होते.

तौशाचे फ़ेस्त:

या विस्तृत मेजवानीच्या केंद्रस्थानी एक लक्ष्यवेधक प्रथा आहे जिथे भक्त सेंट ॲन यांना आदर म्हणून काकडी अर्पण करतात. हंगामात भरपूर प्रमाणात काकडी तयार होते त्यामुळे या हंगामात हा सण साजरा केला जातो असे म्हटले जाते. गोव्यात हंगामातील पहिली कापणी ही काकडीची केली जाते.

ख्रिस्ती धर्मगुरूंच्या निर्देशानुसार, लोक दोन काकड्या आणतात. या काकड्या मदर मेरीच्या पुतळ्याजवळ ठेवतात. उत्सवादरम्यान भेट दिलेल्या या काकड्या नंतर स्थानिक समुदाय, पुजारी आणि जवळपासच्या गावांमध्ये वाटल्या जातात. काहीजण ताज्या काकड्यांचा आस्वाद घेण्यास प्राधान्य देतात, तर काहीजण सॅलडमध्ये समाविष्ट करतात.

बोंदेरा उत्सव:

मान्सूनच्या पावसाने निसर्ग चिंब होत असताना, दिवारचे नयनरम्य बेट बोंदेरा महोत्सवाने न्हाऊन निघते. ऑगस्टच्या चौथ्या शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे रंगीत परेड. ज्यामध्ये गावातील प्रतिस्पर्धी पाड्यांमध्ये हास्य विनोद केला जातो.

प्रत्येक गट रंगीबेरंगी झेंड्यांनी सजलेले चित्ररथाचे प्रदर्शन करतो. सुंदर चित्ररथासाठी बक्षीस आयोजित केलेले असते त्यामुळे चित्ररथांची स्पर्धा असते. या उत्सवाला पर्यटक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात, ते संगीत, नृत्य आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतात.

अशाप्रकारे गोव्याचा मान्सून म्हणजे निव्वळ बरसणाऱ्या पावसाच्या सारी एवढाच मर्यादित नाही. गोव्याची संस्कृती आणि परंपरा यांचे दर्शन घडवणारे हे उत्सव खऱ्या अर्थाने येथील मान्सूनचं आकर्षण आहे. त्यामुळे, तुमच्या बॅग पॅक करा, तुमचा आवडत्या सणाचा पोशाख घाला आणि गोव्यातील या पावसाळी उत्सवांच्या जादूमध्ये मग्न व्हा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# दोन्ही पाय गमावणाऱ्या तरुणाला शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांचा मदतीचा हात

## संपूर्ण उपचार होणार निशुल्क

● कल्याण : रेल्वे प्रवासा दरम्यान रेल्वे रुळावरून चालू गाडीतील दरवाज्यावर उभ्या असणाऱ्या प्रवाशांचे मोबाईल हिसकावण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून गर्दुल्ले, चोरटे बिनधास्तपणे असे कृत्य करीत आहेत. कल्याणमधील एका तरुणासोबत ही घटना घडली असून या तरुणाला आपले दोन्ही पाय गमवावे लागले आहेत. कल्याण पूर्वेचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी ठाण्यातील खाजगी रुग्णालयात धाव घेऊन त्यांची विचारपूस करीत एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच त्यांच्या हॉस्पिटलमधील भेटीनंतर हायलँड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने देखील मोफत उपचार करणार असल्याचे सांगितले आहे.

कल्याण पूर्वेतील आमराई परिसरात राहणारे जगन जंगले 22 मे रोजी आपले काम आटपून रात्री 9 वाजता दादर ते कल्याण असा लोकलने आपल्या घरचा प्रवास करत होते. ट्रेन ठाणे स्टेशनवरून कळव्याच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. ठाणे प्लॅटफॉर्म क्रमांक 2 पासून अंदाजे 200 मीटर पुढे कळव्याच्या दिशेने ट्रेन धीम्या गतीने पुढे जात असताना काही टवाळखोरांनी मोबाईल खाली पाडण्याच्या उद्देशाने दांड्याने जोरात दरवाजात थांबलेल्या जंगले यांच्या हातावर आघात केला. आघात हातावर जोरात बसल्याने तोल जाऊन ते खाली पडले. याचदरम्यान त्यांचे दोन्ही पाय ट्रेनखाली सापडले.

जगन जंगले हे आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्या कुटुंबाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कल्याण शहरात येऊन भाड्याच्या घरात राहत होते. कल्याण या ठिकाणी राहून दादर पश्चिम येथील एका बुक शॉप मध्ये महिना १५,०००/ पगार असणारी खाजगी नोकरी करून आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करत होते. सकाळी कल्याण ते दादर व रात्री दादर ते कल्याण असा त्यांचा नियमितचा प्रवास होता. हल्लीच फेब्रुवारी महिन्यात त्यांचा विवाह झाला होता. सध्या त्यांच्या दोन्ही पायांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून दोन्ही पाय काढण्यात आले आहेत.



परिस्थितीने अतिशय गरीब असलेल्या, नुकताच आपला प्रपंच थाटलेल्या, आपल्या कुटुंबासाठी अनेक स्वप्ने पाहिलेल्या एका गरीब युवकावर या वयात ओढवलेला प्रसंग हा खरंच मन हेलावणारा आहे. दोन्ही पाय गेल्याने आजन्म अपंगत्व आले.

कल्याण पूर्वचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी ठाण्यातील रुग्णालयात धाव घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कल्याण शहर कक्षप्रमुख चंद्रसेन सोनवळे, युवासेना विधानसभा अध्यक्ष अजय गायकवाड, अक्षय गाडे आदि उपस्थित होते. त्याचबरोबर पुढील उपचारासाठी मदतीचा हात म्हणून त्यांना मातोश्री गुंजाई फाउंडेशनच्या माध्यमातून एक लाख रुपयांची मदत केली. त्याचबरोबर खासदार डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी द्वारे सहकार्य केले जाणार असल्याचे यावेळी महेश गायकवाड यांनी सांगितले.

महेश गायकवाड यांच्या भेटीनंतर हायलँड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक गोपाळ सिंह यांनी देखील जंगले यांच्यावर पूर्णपणे मोफत उपचार करणार असून याअगोदर जमा केलेली रक्कम देखील कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी परत करणार असल्याचे जाहीर केले. याबद्दल महेश गायकवाड यांनी देखील त्यांचे आभार व्यक्त केले.

## थोडक्यात



### गाडीच्या बोनेटवर बसून स्टंट करणाऱ्याला बाजारपेठ पोलिसांनी केली अटक

● कल्याण : कल्याणमध्ये भर रस्त्यात बीएमडब्लू कारवर बसून स्टंट करणाऱ्या तरुणाला बाजारपेठ पोलिसांनी अटक केली आहे. धक्कादायक म्हणजे ज्या कारवर बसून शुभम मितालिया हा तरुण स्टंट करीत होता. ती कार एक अल्पवयीन मुलगा चालवित होता. ही कारण त्या अल्पवयन मुलाची आहे. पोलिसांनी या प्रकरणात स्टंटबाज तरुण शुभम मितालिया आणि अल्पवयीन मुलाच्या वडिलांच्या विरोधात गुन्हा दाखल आहे. पुण्यात अल्पवयीन कारचालकाचा प्रताम समोर आला आहे. त्या पाठोपाठ ही धक्कादायक घटना समोर आली आहे.

### बुधवारी ठाण्यात पाणी पुरवठा बंद



● ठाणे : पावसाळापूर्व अत्यावश्यक निगा व देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी ठाणे महापालिकेची स्वत:ची पाणी पुरवठा योजना आणि स्टेम प्राधिकरण या दोन्हींकडे बुधवार, २९ मे, २०२४ रोजी स. ९.०० ते गुरूवार, ३० मे, २०२४ रोजी स. ९.०० असा २४ तासांचा शट डाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे त्या काळात ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर रोड, लोकमान्य नगर, वर्तकनगर, साकेत, ऋतू पार्क, जेल, गांधीनगर, रुस्तमजी, सिद्धांचल, इंदिरानगर, रुपादेवी, श्रीनगर, समतानगर, सिद्धेश्वर, इंटरनिटी, जॉन्सन यांच्यासह मुंब्रा आणि कळवा यांचा काही भाग येथील पाणी पुरवठा २४ तासांसाठी बंद राहणार आहे. शट डाऊन संपल्यावर पाणी पुरवठा पूर्वपदावर येईपर्यंत एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी, नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा, तसेच, पाणी काटकसरीने वापरून सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

## कल्याणमध्ये इमारतीच्या सातव्या मजल्यावरील सदनिकेला लागली आग

### सुदैवाने जीवितहानी टळली



● कल्याण : कल्याण पश्चिमेतील गोदरेज हिल परिसरातील क्सोरिना इमारतीच्या सातव्या मजल्यावरील एका सदनिकेला आग लागल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी घडली या आगीत घरातील सामान जळून खाक झाले असले तरी सुदैवाने जिवितहानी टळली आहे.

रविवारी सकाळी क्सोरिना इमारतीच्या सातव्या मजल्यावरील हरिश मक्कवाना यांच्या १४ नं सदनिकेच्या बेडरुममध्ये सकाळी ७.१५ वा. सुमारास आग लागल्याने धुराचे लोट उसळल्याने घरातील सदस्य सुरक्षेसाठी पळापळ करीत सदनिके बाहेर पडले. घटनास्थळी तातडीने कल्याण डोंबिवली मनपाच्या अग्निशमन दलाच्या बंबाने पोहचत. अग्निशमन दलाच्या जवानांनी १ तासाच्या अवधित आगीवर नियंत्रण आणित आग विझवली. या आगीत सदनिकेतील समान जळून खाक झाले. शॉंकसर्किटमुळे आग लागली असावी अशी प्राथमिक माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी संपर्क साधला असता दिली.

## कल्याण मध्य रेल्वेवर फटका गँग पुन्हा सक्रिय झाल्याची भीती



■ कल्याण पूर्वेतील आमराई परिसरात राहणारे जगन जंगले 22 मे रोजी आपले काम आटपून रात्री 9 वाजता दादर ते कल्याण असा लोकलने आपल्या घरचा प्रवास करत होते. ट्रेन ठाणे स्टेशनवरून कळव्याच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. ठाणे प्लॅटफॉर्म क्रमांक 2 पासून अंदाजे 200 मीटर पुढे कळव्याच्या दिशेने ट्रेन धीम्या गतीने पुढे जात असताना फटका गँगने मोबाईल खाली पाडण्याच्या उद्देशाने दांड्याने दरवाजात थांबलेल्या जंगले यांच्या हातावर जोरदार आघात केला. आघात हातावर जोरात बसल्याने तोल जाऊन जगन रेल्वे रुळावर पडले.

● कल्याण : रेल्वे प्रवासादरम्यान रेल्वे रुळावरून वेगात असलेल्या गाडीत दरवाज्यात उभ्या असणाऱ्या प्रवाशांचे मोबाईल हिसकावण्याच्या घटना वाढत आहेत. हे प्रकार गर्दुल्ले, चोरटे करत आहेत. ठाणे ते टिटवाळा रेल्वे स्थानकादरम्यान फटका गँग पुन्हा एकदा सक्रिय होत रेल्वे पोलिसांपुढे आव्हान आहे. जगन जंगले यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या काही महिन्यापासून रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी फटका गँगला जरब बसविण्याकरता रेल्वे रूळालगत धोक्याच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था तैनात केलेली होती. यामुळे काही काळ फटका गँगला आळा बसला होता.

रेल्वेतून प्रवास करीत असताना चोरट्यांनी लोकलच्या दरवाज्यात असलेल्या जगन जंगले या तरुणाच्या हातावर मोबाईल चोरण्यासाठी फटका मारला. त्यामुळे ते धावत्या रेल्वेतून खाली पडले. त्यानंतर लोकलखाली सापडल्याने त्यांना आपले दोन्ही पाय गमावावे लागले. कल्याण पूर्वेचे शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी जगन जंगले यांना दाखल केलेल्या ठाण्यातील खासगी रुग्णालयात धाव घेतली. कल्याण पूर्व येथे राहत असणारे जगन जंगले याचे या दुर्घटनेत दोन्ही पाय निकामी झाल्याने त्यांची विचारपूस करीत एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच त्यांच्या हॉस्पिटलमधील भेटीनंतर हायलँड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने देखील मोफत उपचार करणार असल्याचे सांगितले आहे.

## भिवंडीतील ऑर्क्रेस्टा बारवर क्राईम ब्रांचची कारवाई, मॅनेजरसह १० जणांविरोधात गुन्हा दाखल




● ठाणे : भिवंडी येथील रांजनोली भागातील 'सी रोझ बार अँड रेस्ट्रॉरंट' या ऑर्क्रेस्टा बारवर भिवंडी गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा मारला. या बारचा व्यवस्थापक आणि अश्लील हावभाव करून नृत्य करणाऱ्या महिला वेटर यांच्यासह १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजनोली येथे रात्री उशीरापर्यंत सी रोझ हा ऑर्क्रेस्टा बार सुरू असल्याची माहिती भिवंडी गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांनी सी रोझ बार अँड रेस्ट्रॉरंटवर छापा मारला. बारमध्ये मद्यपान करत असलेल्या गिऱ्हाईकांना येथील महिला वेटर अश्लील हाव भाव करत मद्य देत असल्याचे पथकाला निदर्शनास आले. याप्रकरानंतर पोलिसांनी तात्काळ हा प्रकार थांबविला. सोमवारी पहाटे पोलिसांनी याप्रकरणात बारच्या व्यवस्थापकासह कर्मचारी आणि महिला वेटर विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



ठाणे महानगरपालिकेच्या वतीने, माजी पंतप्रधान, भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने, महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी.जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी, महापालिकेचे विधी सल्लागार मकरंद काळे, सहाय्यक आयुक्त (लोकमान्य नगर-सावरकर नगर प्रभाग समिती) भालचंद्र घुगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. त्याचबरोबर, उथळसर प्रभाग समितीत, आंबे-घोसाळे तलावाशेजारी असलेल्या पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# कोकणात राज ठाकरेंची भाजपला साथ नाही, मनसेकडून 'पदवीधर'साठी अविनाश पानसे

● ठाणे : लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठींबा देत महायुतीच्या सभांमध्ये सहभागी झालेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाजपचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पक्षाकडून अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर करून सोमवारी भाजपला धक्का दिला. या मतदारसंघात भाजपचे निरंजन डावखरे हे आमदार असून सलग तिसऱ्यांदा ते निवडणुक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. असे असताना मनसेकडून पानसे यांची उमेदवारी जाहीर झाल्याने भाजपस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतही खळबळ उडाली असून राज यांनी या निवडणुकीतून माघार घ्यावी यासाठी महायुतीच्या गोटात प्रयत्न सुरु झाल्याची चर्चा आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. २०१२ मध्ये निरंजन डावखरे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि तत्कालिन आमदार संजय केळकर यांचा पराभव करत पहिल्यांदा भाजपच्या या बालेकिल्ल्याला खिंडार पाडले. २०१८ मध्ये पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकांच्या आधी त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने त्यांना लगेचच या मतदारसंघातून भाजपची उमेदवारी जाहीर झाली. या निवडणुकीत तेव्हाच्या एकसंघ शिवसेनेचे उमेदवारी आणि ठाण्याचे माजी महापौर संजय मोरे यांचा त्यांनी पराभव केला. त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून नजीब मुल्ला हेदेखील डावखरे यांच्याविरुद्ध रिंगणात होते. या तीन ठाणेकर उमेदवारांमध्ये झालेल्या लढतीत डावखरे यांनी पाच हजारांपेक्षा अधिक मतांनी मोरे यांचा पराभव केला. यानंतर गेले सहा वर्ष निरंजन या मतदारसंघात बांधणी करत आहेत. पदवीधर मतदारांची नोंदणी करणे, कोकण पट्ट्यातील शिक्षण संस्थांसोबत संपर्क ठेवणे तसेच याच भागातील सर्वपक्षीय नेत्यांच्या संपर्कात राहून निवडणुकीसाठी



आवश्यक असलेला संपर्क प्रस्थापित करण्यात निरंजन यांचा हातखंडा राहीला आहे. राज्यातील बदलेल्या राजकीय समिकरणांमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची अतिरीक्त मदत यावेळी निरंजन यांनी गृहीत धरल्याने हा मतदारसंघ भाजपसाठी सोपा राहील असे तर्क लढविले जात असताना राज ठाकरे यांनी अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर करून महायुतीच्या गोटात मिठाचा खडा टाकल्याची चर्चा आता सुरु झाली आहे.

लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठींबा देत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात मनसैनिकांना उतरविले होते. मुंबई, ठाण्यात राज यांच्या पक्षाची रसद महायुतीच्या उमेदवारांमागे उभी करण्यात भाजपला काही प्रमाणात यश आल्याचे दिसले. ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघात शिंदेसेनेच्या उमेदवारांसाठी मनसेचे अविनाश जाधव, अभिजीत पानसे हे नेते पुर्ण ताकदीने प्रचारात दिसले. ठाण्यात नरेश म्हस्के यांच्या प्रचाराची मोठी जबाबदारी पानसे यांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. कधी नव्हे ते या काळात टेंभी नाका येथील आनंद मठीत मनसे नेत्यांचा वावर दिसू लागला होता. भाजप, शिवसेना आणि मनसेचे सुत उत्तम जुळले असल्याचे चित्र एकीकडे दिसत असताना सोमवारी कोकण पदवीधर मतदारसंघातून राज ठाकरे यांनी अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर करत भाजपला धक्का दिला. या मतदारसंघातून पुन्हा निवडणुक लढविण्याची पुर्ण तयारी निरंजन डावखरे यांनी केली आहे.

असे असताना महायुतीतील नेत्यांची चर्चा करण्यापुर्वीच राज यांनी येथून पानसे यांची उमेदवारी जाहीर केल्यामुळे भाजप नेते अस्वस्थ झाले आहेत. सोमवारी सकाळी उमेदवारी जाहीर होताच सायंकाळी नौपाडा येथील पक्षाच्या कार्यालयात अविनात जाधव आणि अभिजीत पानसे यांनी पत्रकारांशी संवाद साधत आम्ही कामाला सुरुवात केल्याचे जाहीर केले. दरम्यान पानसे यांची उमेदवारी मागे घ्यावी यासाठी भाजपचे नेते लवकरच राज यांना साकडे घालतील अशी माहिती पक्षाच्या एका नेत्याने लोकसत्ताला दिली. लोकसभा निवडणुकांचा निकाल जाहीर होत नाही तोच पानसे यांची उमेदवारी जाहीर झाल्याने आम्हालाही धक्का बसला अशी प्रतिक्रिया शिंदेसेनेतील एका नेत्याने लोकसत्ताला दिली. लोकसभा निवडणुकीत भाजपसोबत मनसे नेतेही आमच्या खांद्याला खांदा लावून प्रचारात होते. त्यामुळे राज यांची भूमीका अचंबित करणारी आहे, असे या नेत्याने सांगितले.

# एक था राजा, एक थी रानी...! 'धडक 2' ची घोषणा, ही जोडी मुख्य भूमिकेत दिसणार

'धडक' हा 2018 साली आलेला सिनेमा शशांक खेतानने दिग्दर्शित केला होता. यामधून जान्हवी कपूर आणि ईशान खट्टरने पदार्पण केले होते. सिनेमाला जेमतेमच प्रतिसाद मिळाला होता. त्यातच आता करण जोहरने 6 वर्षांनी या सिनेमाच्या सीक्वेलची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे 'धडक 2' (Dhadak 2) मध्ये फ्रेश जोडी बघायला मिळणार आहे. तसंच शशांक खेतान यांच्या जागी नवीन दिग्दर्शक असणार आहे. कोण आहे धडक २ मध्ये वाचा.

बॉलिवूड निर्माता करण जोहरच्या आगामी सिनेमाची घोषणा झाली आहे. 'धडक 2' सिनेमा यावर्षी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. विशेष म्हणजे यामध्ये सिद्धांत चतुर्वेदी आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. ईशान खट्टर आणि जान्हवी कपूरला त्यांनी रिप्लेस केलंय. सिनेमाची घोषणा करत




मेकर्सने व्हिडिओ शेअर केला आहे. शाजिया इक्बाल सिनेमाच्या दिग्दर्शिका आहेत. एक राजा, एक रानी, एक कहानी - २ धडकने! असं कॅप्शन देण्यात आलं आहे. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या या राजा राणीमध्ये जात आडवी येते आणि कहाणी संपते अशी सिनेमाची लाईन आहे. सिद्धांत आणि तृप्ती यांचा फोटो शेअर करत सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. याचवर्षी २२ नोव्हेंबरला सिनेमा रिलीज होणार आहे. दरम्यान गेल्या वर्षी करण जोहरने सोशल मीडियावरुन 'धडक 2' च्या अफवा असल्याचं म्हटलं होतं. मात्र आता त्याचंच म्हणणं खोटं ठरलं आहे.

'धडक' हा सिनेमा मराठीतील सुपरहिट 'सैराट'चा हिंदी रिमेक होता. नागराज मंजुळेंच्या सैराटने रेकॉर्डब्रेक कामगिरी केली होती. आता सैराट 2 च्या आधीच 'धडक 2' ची घोषणा झाली आहे.

## गौतम गंभीर टीम इंडियाचा पुढील मुख्य प्रशिक्षक, जय शाह यांच्या भेटीनंतर चर्चेला उधाण



चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमर रविवारी रात्री आयपीएल २०२४ चा फायनल सामना केकेआर आणि एसआरएच संघात पार पडला. या सामन्यात कोलकाताने हैदराबादचा ८ विकेट्सनी धुव्वा उडवत १० वर्षांनी तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली. या विजयानंतर केकेआरचे सर्व सदस्य जेतेपदानंतर आनंद साजरा करत असताना, संघाचा मार्गदर्शक गौतम गंभीरने बीसीसीआयचे सचिव जय शाह यांची भेट घेतली. त्यांच्या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यामुळे आता गंभीरच्या भारतीय संघाचा प्रशिक्षक होण्याची अटकळ पुन्हा सुरू झाली आहे.

केकेआरने विजेतेपदाचा दुष्काळ संपवला –

या हंगामापूर्वी, केकेआरने २०१२ आणि २०१४ मध्ये ट्रॉफी जिंकली होती आणि त्यावेळी संघाचा कर्णधार गौतम गंभीर होता. गंभीरच्या निवृत्तीनंतर केकेआरने जेतेपदाची दीर्घकाळ वाट पाहिली, पण आता गंभीर मार्गदर्शक बनल्याने कोलकाता टीम चॅम्पियन म्हणून उदयास आली. गंभीरने २०२२ च्या हंगामापासून आयपीएलमध्ये सामील झालेल्या लखनऊ सुपर जायंट्ससचा दोन वर्ष मार्गदर्शक राहिला. या दरम्यान गौतम गंभीरने दोनदा प्लेऑफ्समध्ये पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. २०२३ च्या हंगामानंतर, शाहरुख खान गंभीरला पुन्हा संघात समाविष्ट करण्यात स्वारस्य दाखवत असल्याच्या बातम्या येऊ लागल्या आणि शेवटी गंभीर एक मार्गदर्शक म्हणून कोलकाता संघात परतला.

## जान्हवी कपूर दरवर्षी तिरुपती मंदिरात का जाते? याबद्दल तिने केला खुलासा..



अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या तिच्या 'मिस्टर अँड मिसेस माही' या चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशन निमित्ताने अभिनेत्रीने नुकतीच लल्लनटॉपच्या मुलाखतीला उपस्थिती लावली होती. यावेळी आई श्रीदेवी यांच्या आकस्मिक निधनामुळे जान्हवीवर काय परिणाम झाला, ती धार्मिक गोष्टींकडे कशी वळली याबाबत अभिनेत्रीने खुलासा केला आहे.

श्रीदेवी अतिशय धार्मिक होत्या याबद्दल सांगताना जान्हवी म्हणाली, "ती अशा गोष्टींवर विचार करायची ज्याचा कोणीही कधीच विचार देखील केला नसेल. काही विशेष तारखांना विशिष्ठ कामं करून घ्यावीत यावर तिचा खूप विश्वास होता. 'शुक्रवारी केस कापू नयेत कारण, त्यामुळे लक्ष्मी घरात येत नाही' आणि 'शुक्रवारी काळे कपडे घालणं टाळावं' अशा बऱ्याच गोष्टींवर तिचा विश्वास होता. पण, मी यावर कधीच विश्वास ठेवला नाही."जान्हवी पुढे म्हणाली, "तिच्या निधनानंतर मला या सगळया गोष्टी जाणवू लागल्या. ती हयात असताना मी एवढी धार्मिक होते की नाही मला खरंच माहिती नाही. पण, आता आम्ही तिच्यासाठी या सगळया प्रथा पाळतो. कारण मम्मा हे सगळं काही फॉलो करायची.

## नागपूरच्या 'निर्मिती'ला मुंबई फिल्म फेस्टीव्हलचा मानाचा पुरस्कार

नागपूर : उपराजधानीत तयार झालेली 'आबरू' या लघू चित्रपटाच्या दिग्दर्शक निर्मिती जीवनतारे यांना मुंबई एंटरटेंमेंटमेंट इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल मध्ये यावर्षीचा उत्कृष्ट महिला दिग्दर्शक हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळविणारी निर्मिती ही विदर्भातील पहिलीच दिग्दर्शक आहे. २४ वर्षीय निर्मिती ला नाट्यकलेचे बालकडू घरुनच मिळाले आहे. अवघ्या बारा वर्षाची असताना तिने महासम्राट अशोक या महानाट्यात मध्यवर्ती भूमिका केली होती. या महानाट्याचा प्रयोग कर्नाटकात सादर झाला होता. व्हीएमव्ही कॉलेजमध्ये शिकत असताना थिएटर अँड आर्ट पदवी अभ्यासक्रम करताना बादल सरकार यांच्या 'सुरज का सातवा घोडा', पराग घोंगे यांच्या 'मानसीचा शिल्पकार तो' , प्रभाकर दुपारे यांच्या 'स्मशान', रमेश लकमापुरे यांच्या 'गाडगेबाबा' या नाटकातून अभिनयाची छाप सोडली. याशिवाय दादाकांत धनविजय यांच्या 'गुलसिता' या लघू चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही तिने काम केले आहे. प्रमोद काळबांडे लिखित ' संविधान ' या एकपात्री नाट्याचे अनेक प्रयोग केले.




उपराजधानीतील नाट्य क्षेत्र गाजविल्यानंतर पुढील शिक्षणासाठी निर्मिती केरळ येथील एल. व्ही. प्रसाद फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये फिल्म मेकिंग कोर्स पूर्ण केला. यात दिग्दर्शन म्हणून स्पेशलायझेशन कोर्स केला. यादरम्यान 'आबरु' हा लघुपट पूर्ण केला. या चित्रपटाला उत्कृष्ट महिला दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. येत्या २२ जून रोजी मुंबई येथे होणाऱ्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते तिला सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय पुणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल मध्ये आबरू या लघुपटाची निवड झाली असून, तीन जूनला या लघुपटाचे सादरीकरण पुण्यातच होणार आहे.

'मी तयार केलेल्या 'आबरू' या लघू चित्रपटासाठी उत्कृष्ट महिला दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळणे, ही माझ्यासाठी आनंद व अभिमानाची गोष्ट आहे. यामुळे केवळ माझा तर आत्मविश्वास वाढणार आहेच, शिवाय नागपूर व विदर्भातील नाट्यक्षेत्रात काम करणाऱ्या इतरही कलावंतांना विशेषतः तरुणांना मोटिव्हेशन मिळणार आहे,' असे सिने दिग्दर्शका निर्मिती जीवनतारे यांनी म्हटलं.

## दरराेज किती प्रमाणात फायबरयुक्त आहार घ्यावा? जाणून घ्या,

निरोगी आरोग्यासाठी चांगली जीवनशैली आणि पौष्टिक आहार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात अनेकदा आपण आहाराकडे लक्ष देत नाही. यामुळे आपल्या शरीरास उपयुक्त प्रोटिन्स, मिनरल्स आणि फायबरयुक्त आहार मिळत नाही. आज आपण आहारातील फायबरचे महत्त्व आणि नियमित किती प्रमाणात फायबरचे सेवन केले पाहिजे, हे जाणून घेणार आहोत.

फायबर हा आहारातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. फायबरच्या सेवनाने पचनक्रिया सुरळीत राहते, रक्तातील साखर नियंत्रित राहते, याशिवाय इतर अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. हैदराबाद येथील केअर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा यांनी फायबरचे अति सेवन केल्यानंतर काय होते, याविषयी सांगितले आहे.

सुषमा सांगतात, "फायबरचे अतिसेवन केल्याने तुमच्या शरीरावर परिणाम करणाऱ्या अनेक प्रकारच्या शारीरिक प्रक्रिया होऊ शकतात. जेव्हा तुम्ही शरीरात फायबरचे अतिसेवन करता तेव्हा शरीरावर ताण येतो, यामुळे पचनक्रियेची समस्या उद्भवू शकते. आतड्यांच्या आरोग्यावरही याचा परिणाम दिसून येतो.

"फायबरयुक्त आहार आरोग्यासाठी फायदेशीर असला तरी याचे अति प्रमाणात सेवन केल्याने आरोग्यावर याचे परिणाम होऊ शकतात," असे सुषमा सांगतात. यामुळे पोटाशी संबंधित आणि अतिसारसारख्या समस्या उद्भवू शकतात कारण फायबरमुळे लवकर पोट साफ होते. जेव्हा फायबरचे अतिप्रमाणात सेवन केले जाते तेव्हा आपल्या पचनसंस्थेवर ताण येतो.



### फायबरचे किती सेवन करावे?

फायबर किती खावे याचे प्रमाण वय, लिंग आणि कॅलरीचे सेवन इत्यादी घटकांवर अवलंबून असते आणि त्यानुसार ते बदलते. सुषमा यांनी प्रौढांसाठी दररोज २५-३० ग्रॅम फायबरचे सेवन करण्याचा सल्ला दिला आहे. हा आकडा पचनसंस्थेवर परिणाम न करता आरोग्यास फायदेशीर ठरतो, पण यापेक्षा जर तुम्ही जास्त फायबरचे सेवन केले तर त्याचा परिणाम आरोग्यावर वाईट होऊ शकतो.

अतिप्रमाणात फायबरचे सेवन केल्याने शरीरावर दुष्परिणाम दिसून येतात, पण जर योग्यरित्या फायबरचा आहारात समावेश केला तर त्याचे आरोग्यासाठी भरपूर फायदे आहेत. आहारात फायबरचा समावेश करण्याची अनेक प्रमुख कारणे आहेत.

निरोगी पचनसंस्थेसाठी फायबर आवश्यक आहे. फायबर आतड्यांचे आरोग्य सुदृढ ठेवतो. बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करतो.

फायबर रक्तातील साखर शोषून घेतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

फायबरयुक्त आहार खराब कोलेस्ट्रॉलची पातळी ( LDL) कमी करतो, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो. फायबरच्या सेवनाने वारंवार भूक लागत नाही, ज्यामुळे वजन नियंत्रित करणे सोपे जाते.

## दिनविशेष

### घटना

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षांचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८ : मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक

विलीनीकरण आहे.

१९९२: एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

### जन्म

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९ : गोपाल निमाजी वाहनवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४)

१९४८ : नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन: १४ जून २०२०) १९२३ : आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्यअभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार - ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९)

१९०९ : एडविन एच लँड - पोलाराईड कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक (निधन : १ मार्च १९९१)

१८९२ : जोसेफ टिटो - युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (निधन: ४ मे १९८०)

१८८०: पांडुरंग वामन काणे- भारतीय भारतशास्त्रज्ञ आणि संस्कृत विद्वान - भारतरत्न ( निधन : १८ एप्रिल १९७२)

### निधन

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१: प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ऍलन मॅक्लिओड कॉर्मेक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)

१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

## राशि भविष्य

**मेष** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. आजच्या दिवशी तुम्ही मादक पदार्थांचे सेवन करू नका. नशेमध्ये तुम्ही काही किमती वस्तू हरवू शकतात. तुमच्या मुलांच्या बाबत काळजी व्यक्त करून पाठिंबा देणे महत्त्वाचे ठरेल.

**वृषभ** तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. मुलीचे आजारपण तुमचा मूड खराब करु शकते. ती तिच्या आजारवर मात करु शकेल असे चैतन्य, प्रेमाने तिच्यामध्ये निर्माण करा.

**मिथुन** आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा. तुमचे वाचवलेले धन आज तुमच्या कमी येऊ शकते परंतु या सोबतच याच्या जाण्याचे तुम्हाला दुःख ही होईल.

**कर्क** तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. इतर दिवसांपेक्षा आजचा दिवस आर्थिक दृष्टीने चांगला राहील आणि तुम्हाला पर्याप्त धन प्राप्ती होईल. घरात काही घडल्याने तुम्ही खूप भावनिक व्हाल - परंतु, तुमच्या भावना संबंधित व्यक्तीपर्यंत परिणामकारकरित्या पोहोचविण्यात तुम्ही यशस्वी व्हाल.

**सिंह** आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल. या राशीतील व्यावसायिकांना आज आपल्या घरातील त्या सदस्यांकडून दूर राहिले पाहिजे जे तुमच्याकडून पैसा मागतात आणि नंतर परत करत नाही. घरात कोणतेही बदल करायचे असतील घरातील ज्येष्ठांचा सल्ला घ्या.

**कन्या** निसर्गाने आपल्याला लक्षणीय असा आत्मविश्वास आणि बुद्धिमत्तेचे दान दिले आहे, त्याचा उत्तम वापर करा. जे लोक टॅक्सी चोरी करतात ते आज मोठ्या त्रासात फसू शकतात म्हणून, तुम्हाला सल्ला दिला जातो की, टॅक्सी चोरी करू नका. तुमच्या घरातील स्थितीचा काही अंशी अंदाज बांधता येणार नाही.

**तूळ** ज्येष्ठांनी त्यांच्या जास्तीच्या ऊर्जेचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करून त्याचा चांगला लाभ घ्यावा. तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वतःला थांबवतात ही गोष्ट आज तुम्हाला चांगल्या प्रकारे लक्षात येईल.

**वृश्चिक** तुमचा उत्साह वाढविण्यासाठी सुंदर उज्ज्वल आणि वैभवशाली चित्र मनात ठसवा. कुणी जवळच्या नातेवाइकाच्या मदतीने आज तुम्ही आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभ ही होईल. मित्र आणि जवळचे स्नेही मदतीचा हात पुढे करतील.

**धनु** प्रदीर्घ काळापासून तुम्ही अनुभवत असलेले आयुष्यातील तणाव आणि ओढाताण यापासून थोडे मुक्त व्हाल. सगळे ताणतणाव दूर ठेवण्यासाठी तुम्ही तुमची जीवनशैली बदलायला हवी आणि हीच त्यासाठी योग्य वेळ आहे. आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल.

**मकर** तणावामुळे किंचित आजारी पडण्याची शक्यता आहे. त्यातून विश्रांतीसाठी मित्रमंडळी, कुटूंबातील सदस्य यांच्यासोबत वेळ घालवा. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. संवाद, संभाषण आणि चर्चा योग्य मार्गाने जात नसतील तर तुम्ही तुमचा शांतपणा सोडून काहीतरी बोलून बसता.

**कुंभ** मित्राच्या थंड प्रतिसादामुळे तुम्हाला ठेच लागू शकते, पण चित्त शांत ठेवा. त्यामुळे उध्वस्त न होता आपत्ती टाळून मार्ग कसा काढता येईल याचा विचार करा. पैश्याची कमतरता आज घरात कलहाचे कारण बनू शकते अश्या स्थितीमध्ये आपल्या घरातील लोकांसोबत विचारपूर्वक बोला आणि त्यांचा सल्ला घ्या.

**मीन** तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

## मालेगावात माजी महापौर अब्दुल मालिक यांच्यावर गोळीबार



● मालेगाव – येथील माजी महापौर अब्दुल मालिक यांच्यावर रविवारी मध्यरात्री अज्ञात व्यक्तींकडून गोळीबार करण्यात आला आहे. या घटनेत अब्दुल मालिक हे गंभीर जखमी झाले असून त्यांना नाशिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेने मालेगाव शहरात तणाव निर्माण झाला असून पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. मालिक हे रात्री एक वाजेच्या सुमारास येथील जुना राष्ट्रीय महामार्गावरील पिवळा पंप भागात एका दुकानासमोर आपल्या मित्रांसह बसले होते. यावेळी अचानक आलेल्या दोघा हल्लेखोरांनी अगदी जवळून त्यांच्यावर बंदुकीतून गोळीबार केला. त्यांना तीन गोळया लागल्या आहेत. एक गोळी छातीत घुसली असून दुसरी गोळी पायाला लागली. आणखी एक गोळी हाताला स्पर्श करुन गेली आहे.

या गोळीबारात मालिक हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. नंतर नाशिकला हलविण्यात आले. या गोळीबाराचे कारण समजू शकले नसले तरी राजकीय किंवा व्यावसायिक वादातून हा गोळीबार झाला असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मालिक हे 'एमआयएम'चे नेते युनूस ईसा यांचे पुत्र आहेत. गोळीबारानंतर हल्लेखोर लगेच पसार झाले.

या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, साहाय्यक पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू आदी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच घटनास्थळी मोठा जमाव जमा झाला होता. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून हल्लेखोरांचा शोध सुरू आहे.

### आमदार मौलाना यांची टीका..

या गोळीबारप्रकरणी आमदार मौलाना मुफ्ति ईस्माईल यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. शहरात ठराविक अंतराने गोळीबाराच्या घटना घडत आहेत. यावरून पोलिसांचा गुन्हेगारांवर कोणताही धाक असल्याचे दिसत नाही, असे मौलाना म्हणाले. अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी गोळीबाराच्या अशा घटना घडत असतील, तर गल्लीबोळात काय परिस्थिती असेल, असा प्रश्न उपस्थित करून मालेगावात जंगलराज सुरू असल्याची टीकाही मौलाना यांनी केली. हल्लेखोरांना तातडीने अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# शरद पवारांचे २ युवा शिलेदार अजित पवारांकडे

## 'तुतारी' खाली ठेवत हाती 'घड्याळ' बांधणार



● मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे २ युवा शिलेदार अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीची महत्त्वाची बैठक अजित पवारांच्या नेतृत्वात होत आहे. या बैठकीला शरद पवार गटाच्या युवक आणि युवती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा आणि सोनिया दुहन यांचा पक्षप्रवेश होणार आहे. या बैठकीला हे दोघेही दाखल झाल्याची माहिती आहे.

या बैठकीला उपस्थित धीरज शर्मा यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, हा निर्णय अचानक झाला नाही. अनेकदा अशी परिस्थिती तयार होते, त्यातून भावनात्मक निर्णय घ्यावा लागतो. गेल्या १८ वर्षापासून मी पक्षासोबत काम करतोय. प्रत्येक चढउतारात पक्षाचं काम करतोय. परंतु देशात मी प्रत्येक ठिकाणी असं वातावरण बघतोय. त्यात देशाच्या विकासासाठी जे व्हिजन आहे त्यात युवकांचा विश्वास मोदींसोबत आहे. जर देशातील कोट्यवधी लोक विकासावर एका व्यक्तीवर विश्वास ठेवत असेल तर नकारात्मक राजकारणातून सकारात्मक राजकारणाकडे जाण्यासाठी मी अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला असं त्यांनी म्हटलं.

तसेच पक्षाने महाराष्ट्राबाहेर विस्तार करण्याचा विचार सोडून दिला आहे. त्यात राज्यातील लोक अजित पवारांवर विश्वास ठेवतात. त्यामुळे युवकांचे भवितव्य अजित पवारांच्या नेतृत्वात चांगले होऊ शकते असं मला वाटतं. विरोधी पक्ष म्हणून आम्ही जे मुद्दे उचलले त्यासाठी तोडगा निघत असेल तर सारखं विरोधी आहोत म्हणून विरोधातच राजकारण करणं मला पटत नाही. देशातील लोकांचा विश्वास मोदींवर आहे. मी अनेक युवकांशी चर्चा केली. २६ राज्यात संघटनेतील युवकांशी बोललो. देशाचा भवितव्याचा विचार आपल्याला करायला हवा असं युवकांचे म्हणणं आहे. अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रीय स्तरावर आम्ही चांगले योगदान देऊ शकतो असंही धीरज शर्मा यांनी म्हटलं.

दरम्यान, सोनिया दुहन यांनीही अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या बैठकीला हजेरी लावली आहे. मात्र दुहन यांनी अद्याप कुठलीही भूमिका स्पष्ट केली नाही. परंतु त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून सोनिया दुहन यांनी प्रोफाईल बदलून एकप्रकारे पक्षातून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहे. अजित पवारांच्या उपस्थितीत धीरज शर्मा आणि सोनिया दुहन यांचा पक्षप्रवेश होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# मनसे कार्यकर्ते थेट राज ठाकरेंनाच व्हिडिओ पाठवणार; मनातील भावना व्यक्त करणार

● नाशिक - राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी थंडावली आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आता ४ जूनच्या निकालाची वाट पाहत आहेत. त्यातच यंदाच्या निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे मनसे कार्यकर्तेही पक्षाचा एकही उमेदवार नसतानाही महायुतीच्या प्रचारात सक्रीयपणे उतरले होते. आता प्रचार संपल्यामुळे नाशिक इथं मनसेनं कार्यकर्त्यांना मिसळ पार्टीचं आयोजन केले होते. मात्र या मिसळ पार्टीतून कार्यकर्त्यांच्या मनातील नाराजी कॅमेऱ्यात कैद करण्यात आली. हा व्हिडिओ राज ठाकरेंना पाठवणार असल्याचं पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



याबाबत मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे म्हणाले की, प्रचारात कार्यकर्त्यांनी महायुतीच्या प्रचारात प्रचंड तळागाळात उतरून काम केले होते. या कार्यकर्त्यांना त्यांच्या मनातील भावना व्यक्त करायच्या होत्या, कुठेतरी मनमोकळं करायचं होतं त्यासाठी निवडक काही पदाधिकारी, कार्यकर्ते, गेली २० वर्ष मनसेसोबत निष्ठेने काम करतायेत त्यांच्यासाठी मिसळ पार्टीचं आयोजन केले होते. त्याठिकाणी कार्यकर्त्यांनी त्यांच्या मनातील भावना व्यक्त केल्या, ज्या अतिशय पूरक आणि पक्षाच्या चौकटीत बसणाऱ्या होत्या. आगामी विधानसभा, महापालिका निवडणुकीच्या संकल्पना मांडल्या. त्याचं आम्ही व्हिडिओ रेकॉर्डिंग केले. या भावना राजसाहेबांकडे पोहचल्या पाहिजेत त्यादृष्टीने आम्ही हे नियोजन केले होते असं त्यांनी सांगितलं.

तसेच यात नाराजीचा सूर कुठेही नव्हता. राज ठाकरेंच्या आदेशाप्रमाणे कार्यकर्ते काम करत असतात. अनेकदा ग्राऊंडवर काम करणारा कार्यकर्ते त्याच्या मनातील भावना वरिष्ठांकडे व्यक्त करताना कमी पडतो, त्यामुळे या कार्यकर्त्यांसाठी आम्ही हे व्यासपीठ बनवलं. हा आमचा प्रयोग यशस्वी झाला. २०० पदाधिकारी, कार्यकर्ते इथं होते. याठिकाणी खेळीमेळीत ही मिसळ पार्टी पार पडली. त्याशिवाय आमच्यात कुठेही गटतट नाही. आम्ही सर्व एकच आहोत. गेल्या २ महिन्यापासून जे विविध उपक्रम झाले. त्यात आम्ही सर्व जोमाने आणि एकत्रित काम करतोय. त्यामुळे कुणीतरी मनसेच गट पडलेत असा गैरसमज पसरवला आहे. आम्ही हे सर्व एकमेकांना सांगूनच केलं होतं. पुढच्या टप्प्यात उरलेले पदाधिकारी त्यांचा मेळावाही होणार आहे असंही मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे यांनी सांगितले.

## समुद्र किनारी अतिउत्साह ठरतोय जीवघेणा, आरे-वारे समुद्रकिनारी चार जण बुडाले



● रत्नागिरी : सागरी पर्यटनाचा विचार करता रत्नागिरीतील स्वच्छ व मनमोहक समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालतात. मात्र अलिकडील काळात अतिउत्साही पर्यटकांचा उत्साह त्यांच्या जीवावर बेततो आहे. देवदर्शनासह सुट्टीतील मौज-मजा करण्यासाठी आरे-वारे समुद्रकिनारी आलेल्या रत्नागिरीतील गाडेकर कुटुंबियातील चौघेजण समुद्रात बुडाले. त्यातील तिघांना वाचवण्यात स्थानिकांसह नातेवाईकांना यश आले आहे . तर पंकज रामा गाडेकर (वय 33 राहणार पुणे, मूळ कारवांचीवाडी रत्नागिरी) यांचा बुडून मृत्यू झाला. रविवारी सायंकाळी 6:30 वाजता ही घटना घडली. नोकरीनिमित्त पुणे येथे स्थायिक असलेले पंकज रामा गाडेकर हे पत्नी मयुरी गाडेकर यांच्यासह रत्नागिरीतील कारवांचीवाडी येथील आपल्या गावी सुट्टीसाठी आले होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गाडेकर कुटुंब रविवारी दुपारी अंगारकी संकष्टीनिमित्त गणपतीपुळे येथे विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी गेले होते.

# 'ईव्हीएम' एकदम सुरक्षित; सीसीटीव्ही, त्रिस्तरीय सुरक्षा! गोरेगाव, विक्रोळी, शिवडीत स्ट्राँगरूम

● मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी उपनगरात चार जागांसाठी ८७ उमेदवार, तर मुंबई शहर जिल्ह्यात दोन जागांसाठी २९ उमेदवार, असे एकूण ११६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्याकरिता नऊ हजार ९०२ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. या सर्व मतदारांचे भवितव्य ईव्हीएम यंत्रात बंदिस्त झाले असून, ही यंत्रे गोरेगाव, विक्रोळी आणि शिवडी येथील स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहेत.



५३ लाख मतदारांनी बजावला हक्क -

१) मुंबईतील सहा मतदारसंघात ९९ लाख ३८ हजार ६२१ मतदार आहेत. त्यापैकी ५३ लाख ७३ हजार ४६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

२) मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम आणि मुंबई उत्तर मध्य मतदारसंघाची मतमोजणी नेस्को, गोरेगाव येथे होणार आहे.

३) तसेच उर्वरित मुंबई उत्तर पूर्व या मतदारसंघाची मतमोजणी उदयांचल शाळा, विक्रोळी येथे होणार आहे. आणि दक्षिण मुंबई आणि मध्य मतदारसंघाची मतमोजणी शिवडी वेअरहाऊस, सीएफएस एरिया, शिवडी येथे होणार आहे.

### प्रवेशाला बंदी-

■ निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून या स्ट्राँग रूमला सीआरपीएफ, एसआरपीएफ आणि मुंबई पोलिस अशी त्रिस्तरीय सुरक्षा देण्यात आली आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून वॉच ठेवला जात आहे. सर्व स्ट्राँग रूमला त्रिस्तरीय सुरक्षिततेचे कोंदण आहे. स्ट्राँग रूममध्ये इतर कोणत्याही लोकांना प्रवेश नसतो. निवडणूक अधिकारी त्याची पाहणी करतात. स्ट्राँग रूममधील ईव्हीएम नेण्याची व्यवस्था, वीजपुरवठा, अग्निसुरक्षा उपाययोजना, स्ट्राँग रूममधील रजिस्टर्सची देखभाल याची माहिती घेतल्याचे उपनिवडणूक अधिकारी कार्यालयाने सांगितले.


### दिवसातून तीन अधिकाऱ्यांची भेट -

■ या स्ट्राँग रूमला दिवसातून तीन उच्च अधिकाऱ्यांकडून भेट दिली जाते. त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला दिला जातो. मुंबईतील तिन्ही स्ट्राँग रूम सुरक्षित आहेत की नाही, यासाठी उपनगर जिल्हाधिकारी आणि मुंबई शहर जिल्हाधिकारी यांनी स्वतः स्ट्राँग रूमला भेट दिली आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी 394 मीटर लांबीचा एडीआयटीचा बोगदा पूर्ण !

● मुंबई : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी घणसोली येथे 394 मीटर लांबीच्या इंटरमीडिएट बोगद्याचे (एडीआयटी) खोदकाम करण्यात आले आहे. यामुळे महाराष्ट्रातील बीकेसी ते शिळफाटा दरम्यान 21 किलोमीटर लांबीच्या बोगद्याच्या बांधकामाला गती मिळणार आहे.

26 मीटर खोल झुकलेल्या एडीआयटीमुळे न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एनएटीएम) द्वारे 3.3 किमी (अंदाजे) बोगद्याचे बांधकाम सुलभ होईल. ज्यामुळे दोन्ही बाजूंनी 1.6 मीटर (अंदाजे) बोगद्यासाठी एकाच वेळी प्रवेश मिळेल. बोगद्याच्या 21 किमी बांधकामापैकी 16 किमी टनेल बोरिंग मशिनद्वारे तर उर्वरित 5 किमी एनएटीएमद्वारे आहे.



एडीआयटीसाठी 6 डिसेंबर 2023 रोजी खोदकाम सुरू करण्यात आले असून 394 मीटर लांबीची संपूर्ण लांबी सहा महिन्यांच्या अल्पावधीत खोदण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या देखरेखीखाली 27 हजार 515 किलो स्फोटकांचा वापर करून एकूण 214 नियंत्रित स्फोट करण्यात आले आणि सुरक्षित उत्खननासाठी उच्च दर्जाच्या उपकरणांचा वापर करण्यात आला.

बोगदा आणि आजूबाजूच्या परिसरातील सर्व वास्तूंचे सुरक्षित उत्खनन व्हावे, यासाठी अनेक मॉनिटरिंग उपकरणांचा वापर केला जात आहे. या कामासाठी एसएसपी (सरफेस सेटलमेंट पॉइंट), ओडीएस (ऑप्टिकल डिस्प्लेसमेंट सेन्सर) किंवा दोन्ही अक्षातील विस्थापनासाठी टिल्ट मीटर, बीआरटी (टार्गेट/थ्रीडी टार्गेटप्रतिबिंबित करून), बोगद्याच्या पृष्ठभागावरील सूक्ष्म ताणांसाठी स्ट्रेन गेज, पीक पार्टिकल व्हेलोसिटीसाठी सिस्मोग्राफ (पीपीव्ही) किंवा व्हायब्रेशन अँड सिस्मिक वेव्ह मॉनिटर ही उपकरणे वापरली जात आहेत.

## Minor's blood sample thrown in dustbin, DNA mismatch revealed foul play, say police



● Pune - Doctors at the government-run Sassoon General Hospital who collected the blood sample of the minor, accused of mowing down two young engineers with a Porsche car last week, threw them in a dustbin and sent another person's blood to the forensic lab, said the Pune police on Monday.

Pune Police Commissioner Amitesh Kumar said on Monday Dr Ajay Taware, the head of the Sassoon Hospital's forensic medicine department, and Dr Shrihari Harnol have been arrested for allegedly changing the blood sample of the minor boy.

Kumar said their investigation into the Pune Porsche case revealed Dr Harnol collected the minor's blood samples and threw them in a dustbin at the Sassoon hospital. Then as a part of the criminal conspiracy involving Dr Tawre, the blood sample of another person was taken and sent to the forensic lab with the minor's name on it, added Kumar.

The police commissioner said both doctors were arrested early in the morning and charged under sections 120 b (criminal conspiracy), 467 (forgery), 201 (destruction of evidence), 213 (taking gift or something else to screen an offender from punishment), and 214 (offering gift or restoration of property to screen an offender) of the Indian Penal Code (IPC).

# Samruddhi Mahamarg's 76 km stretch in Thane nears completion, set to open in August

● Mumbai - The final 76-kilometre stretch of the Samruddhi Mahamarg in Thane district is nearing completion and is expected to open for traffic by the end of August, said a senior official from the Maharashtra State Road Development Corporation (MSRDC). With the completion of this stretch, the entire 701-kilometre corridor of the Samruddhi Mahamarg will be fully operational.

The official explained that the Thane segment includes 16 bridges and four tunnels with only one bridge still under construction. "This bridge, located in Khardi in Thane district, is the tallest on the Samruddhi Mahamarg, standing at 82 metres tall, equivalent to the height of a 27-story building. The bridge spans two valleys, making the construction particularly complex. Additionally, the 76-kilometre stretch traverses hilly terrain," the official added.



The longest span on the bridge measures 140 metres. Due to the height and wind speed, the construction work is being carried out with extra caution to ensure safety, the official emphasised.

Currently, 625 kilometres of the Samruddhi Mahamarg is open to traffic.The first phase, covering 520 kilometres between Nagpur and Shirdi, was inaugurated by Prime Minister Narendra Modi in December 2022. The second phase, from Shirdi to Bharvir, was inaugurated by Chief Minister Eknath Shinde in May 2023. Earlier this year, an additional 25-kilometre stretch in the Nashik district, between Bharvir and Igatpuri town, was also opened to traffic. Meanwhile, the official stated that the lowest bidders have been selected for the extension of the Samruddhi Mahamarg to Gadchiroli, Gondia, Jalna and Nanded. Work orders for these projects will be issued soon.

## NCW directs Delhi Police to obtain call records, including those of CM Kejriwal, in Swati Maliwal assault case



● Delhi : The National Commission of Women (NCW) on Monday directed the Delhi Police to obtain call records of all relevant individuals in the Swati Maliwal assault case investigation, including those of Chief Minister Arvind Kejriwal. In a post on social media platform X, "It has come to our notice that Mr. Bibhav Kumar was reportedly called after arrival of Swati Maliwal at CM's residence. A letter from Hon'ble Chairperson Rekha Sharma has been sent to Commissioner of Police Delhi to take CDRs of relevant individuals, including the CM, to ascertain on whose direction Mr. Bibhav Kumar was summoned. Additionally, the Commission mandates strict action against individuals issuing rape and death threats to Ms. Maliwal. The accused person(s) should be charged under the relevant provisions of the Indian Penal Code, 1860. A comprehensive report is expected in 3 days."

## थोडक्यात



### पुण्यातील ससून रुग्णालय हे रुग्णालय आहे की ‘गुन्हेगारांना वाचवणारा अड्डा? ‘

● मुंबई , प्रतिनिधी :

पुण्याच्या आरोपीला वाचवण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी ब्लड रिपोर्ट मध्ये फेरफार केली आहे. याबाबत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला असून पुण्यातील ससून रुग्णालय हे रुग्णालय आहे की ‘गुन्हेगारांना वाचवणारा अड्डा असा परखड सवाल उपस्थित केला आहे.

श्री. वडेट्टीवार म्हणतात की,आधी ललित पाटीलचे धंदे याच हॉस्पिटल मधून सुरु होते.ललित पाटीलचे अवैध धंदे सरकारमधील कोणत्या मंत्र्याच्या आशीर्वादाने सुरू होते हे महाराष्ट्राला माहिती आहे. आता पुण्याच्या आरोपीला वाचवण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी ब्लड रिपोर्ट मध्ये फेरफार केली.

वडेट्टीवार म्हणाले की,

पुण्यातील हॉस्पिटल गुंड आरोपी यांच्यासाठी आहे का? असा सवाल करत ललित पाटील प्रकरणापासून या हॉस्पिटलच्या कारभारावर आधीच शंका होती, पण सरकार आणि रुग्णालय प्रशासनाने ह्या शंकेवर आता शिक्कमोर्तब केले आहे.


### पानपट्टीचालकाची कुकरीने वार करून हत्या, बुलढाण्याच्या खामगावमधील थरार

● बुलढाणा, प्रतिनिधी :

क्षुल्लक कारणावरून चौघा इसमांनी पानपट्टीचालकाची हत्या केल्याची घटना खामगाव बस स्थानकासमोर घडली. वादळी वाऱ्यामुळे शहराचा वीज पुरवठा खंडीत झाल्याचा फायदा घेत चौघे आरोपी फरार झाले.

रविवारी रात्री दहा वाजताच्या सुमारास ही खळबळजनक घटना घडली. यामुळे खामगाव शहर हादरले असून आज याप्रकरणी चौघा आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रविवारी रात्री खामगाव शहर व परिसराला वादळाने तडाखा दिला. विजांचा कडकडाट व पाऊसही सुरू असल्याने संपूर्ण खामगाव शहरातील विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. यादरम्यान, खामगाव शहरातील बस स्थानकासमोर असलेल्या जय माँ पानमंदिर येथे चौघेजण आले. यावेळी पानपट्टीचे मालक प्रकाश सोनी हे बाहेरील बाकड्यावर बसले होते. त्यांचा मुलगा गोपाल सोनी (२७, रेखा प्लॉट, खामगाव) पानपट्टीत काम करीत होता. या चौघांनी क्षुल्लक कारणावरून प्रकाश सोनी यांच्याशी वाद घातला. पंधरा दिवसापूर्वी

# भारत-चीन सीमावादावर चर्चा सुरू, पाकिस्तान आता जगाकडे भीक मागतोय: राजनाथ सिंह



● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

आता पाकिस्तानातील खासदारही भारत वेगाने महाशक्ती बनत असल्याचे मान्य करत आहेत. मात्र, ते स्वत: कंगाल होण्यापासून वाचण्यासाठी जगाकडे भीक मागत आहेत, असे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. त्यांनी चीनच्याभारतीय भूमीवरील कथित घुसखोरीबाबत देशातील विरोधी पक्षांचे आरोप फेटाळून लावले. देशाची एक इंचही जमीन कोणीही बळकावू शकत नाही, असे राजनाथ म्हणाले.

देशाची एक इंचही जमीन...

'रक्षणमंत्री म्हणाले की, भाजपने आजपर्यंत देशाच्या सैनिकांच्या धैर्यावर आणि शौर्यावर कधीही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाही; पण विरोधी पक्ष तसे प्रश्न नेहमीच विचारतात. संरक्षणमंत्री या नात्याने मी तमाम नागरिकांना आश्वस्त करू इच्छितो की, देशाची एक इंचही जमीन कोणीही बळकावू शकत नाही.’ याआधीही अनेक वेळा केंद्र सरकारने चीनने भारताची जमीन बळकावल्याचा विरोधकांचा दावा फेटाळून लावला आहे.

### ...तर लोकांना अभिमान वाटेल

भारत-चीन सीमावादावर संरक्षणमंत्र्यांनी एक मोठे विधान केले. ते म्हणाले की, सध्या भारत आणि चीनमध्ये कमांडर स्तरावरील चर्चा चांगल्या वातावरणात होत आहे आणि मला वाटते की, आपण निकालाची वाट पाहिली पाहिजे. परंतु मी कोणत्या टप्प्यावर काय आहे, यावर चर्चा करू लागलो, तर देशातील लोकांना नक्कीच अभिमान वाटेल; पण मला आता काही उघड करायचे नाही. दोन्ही देशांमध्ये सध्या चर्चा सुरू असल्याने तपशील अद्याप निश्चित करणे बाकी आहे, असे संरक्षणमंत्री म्हणाले.

# दिवाळीपूर्वीच विधानसभा निवडणूक, राजकीय पक्षांकडून तयारी सुरू

● मुंबई , प्रतिनिधी :

देशात लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. ४ जून रोजी लोकसभेचा निकाल येणार आहे, त्याआधीच आता राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मुंबईत बैठक होणार आहे. या बैठकीत आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीबाबत आढावा घेण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

राज्यात दिवाळीपूर्वीच विधानसभा निवडणुकीचे मतदान होणार असल्याचे बोलले जात आहे. यामुळे आता राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राज्यातील लोकसभेचे मतदान संपल्यानंतर युती आणि आघाडीच्या नेत्यांमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपाची चर्चा सुरू झाली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज मुंबईत पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत विधानसभा निवडणुकांबाबत चर्चा होणार असल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडून काही महिने झाले. पक्ष फुटीनंतर अजित पवार पहिल्याच सभेत विधानसभा निवडणुकीत ९० जागा लढणार असल्याचे जाहीर केले होते.

### अजित पवार, बावनकुळेंच्या हालचाली



### भाजपामध्येही बैठकांचा धडाका सुरू

राज्यात लोकसभा निवडणुकांसाठीचे मतदान संपताच आता भाजपानेही विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचा धडाका सुरू केला आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १५ जागा मिळाल्या होत्या. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४ जागा मिळाल्या. तर भाजपाने २९ जागा लढवल्या आहेत.

### दोन दिवसात एक हजाराने वाढली तूर! दररोज हजार पोत्यांची आवक



● नागपूर , प्रतिनिधी :

तूरीसोबत तूर डाळीच्या किमतीतही वाढ होत आहे. कळमना धान्य बाजारात केवळ दोनच दिवसात तूर डाळीचे भाव एक हजार, हरभरा ५०० रुपये आणि मिल क्वालिटी गव्हाचे भाव प्रति क्विंटल १०० रुपयांनी वाढले आहेत. भाववाढीसाठी यावर्षी उत्पादन कमी असल्याचे कारण सांगितले जात आहे.

कळमन्यात शनिवारी एक हजाराच्या दरवाढीसह तूरीचे ११,५०० ते १२,९५० रुपये प्रति क्विंटल भावाने सौदे झाले. दररोज एक हजार पोत्यांची आवक आहे. याशिवाय हरभऱ्यात प्रति क्विंटल ५०० रुपयांची वाढ झाली असून भाव दर्जानुसार ६,५०० ते ६,९०० रुपये आहेत. दररोज २ हजार पोत्यांची आवक आहे. गव्हाच्या भावातही तेजी दिसून आली. मिल क्वालिटीचे भाव प्रति क्विंटल १०० रुपयांनी वाढून २,४०० ते २,६०० रुपयांवर पोहोचले. दररोज हजार पोत्यांची आवक असल्याचे धान्य बाजार असोसिएशनचे पदाधिकारी कमलाकर घाटोळे यांनी सांगितले. घाटोळे म्हणाले, जानेवारी महिन्यात अर्थात हंगामाच्या सुरुवातीला तूर ८ हजार रुपयांपासून, फेब्रुवारीत हरभरा ५,५०० रुपये आणि मार्च महिन्यात गव्हाची २,२०० ते २,३०० रुपयांदरम्यान विक्री झाली. पुढे भाव किती वाढतील, हे पुरवठ्यावर अवलंबून राहील.

# दारू पिताना वाद झाला अन् अघडित घडले...




● पुणे, प्रतिनिधी :

दारू पिताना झालेल्या वादातून मित्राचा खून करण्यात आल्याची घटना हडपसर परिसरातील मांजरी फार्म भागात घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकास अटक केली. संतोष भास्कर अडसूळ (वय ४१, रा. हडपसर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी राहुल दत्तात्रय घुले (रा. मांजरी) याला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती हडपसर पोलिसांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, संतोष आणि राहुल मित्र आहेत. दोघांना दारूचे व्यसन आहे. महिनाभरापूर्वी त्यांच्यात वाद झाले होते. शनिवारी रात्री ते मांजरी फार्म परिसरातील पडीक जागेत राहुल, संतोष आणि त्यांचे मित्र दारू प्यायला बसले होते. दारू पिताना राहुल आणि संतोष यांच्यात वाद झाला. राहुलने संतोषला मारहाण केली. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या संतोषला पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. चौकशीत राहुलने बेदम मारहाण केल्याने संतोषचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी पसार झालेल्या राहुलला ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# ३७ जातींपैकी काहींना केंद्रीय सूचीतून वगळणार

### पश्चिम बंगाल ओबीसी प्रमाणपत्र रद्द प्रकरण

● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

२०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीआधी ओबीसी जातींच्या केंद्रीय सूचीत समावेश करण्यात आलेल्या पश्चिम बंगालमधील ३७ ओबीसी जातींच्या छाननीची प्रक्रिया राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने सुरू केली असून निकषात न बसवणाऱ्या त्यातील काही जाती केंद्रीय सूचीतून कायमस्वरूपी वगळल्या जाणार आहेत.

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनंतर कोलकाता उच्च न्यायालयाने २०१० नंतर पश्चिम बंगाल सरकारने दिलेली सर्व ओबीसी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. त्यामध्ये ३७ जातींतील कोणत्या जातींचा समावेश आहे, याची शहानिशा करून या जाती केंद्रीय सूचीतून काढून टाकण्याची शिफारस आयोग केंद्रीय समाजकल्याण मंत्रालयाला करेल, अशी माहिती राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी ‘लोकसत्ता’ला दिली.

२०१४ मध्ये पश्चिम बंगाल सरकारने एकूण ४६ जातींचा ओबीसींचा केंद्रीय सूचीमध्ये समावेश करण्याची शिफारस केली होती. त्यावेळी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ९ जातींचा समावेश करण्यास थेट नकार दिला होता. उर्वरित ३७ जाती केंद्रीय सूचीत समाविष्ट करण्यात आल्या. त्यापैकी ३५ जाती मुस्लिम असून २ जाती हिंदू आहेत. ‘या जातींचा राज्य व केंद्र या दोन्ही सूचींमध्ये समावेश असेल व कोलकाता उच्च न्यायालयाने त्यातील काही जातींची प्रमाणपत्रे रद्द केली असतील तर त्या जाती केंद्रीय सूचीमध्ये कायम ठेवता येणार नाहीत’, असे अहीर यांनी सांगितले.



पश्चिम बंगालमधील ओबीसी जातींची यादी २०१० नंतर वेगाने वाढत गेली. १९९७ ते २०१० या काळात ६० ओबीसी जाती होत्या. त्यामध्ये ५४ हिंदू व १२ मुस्लिम होते. २०२२ पर्यंत ओबीसी जातींची संख्या १७९ झाली. त्यातील अ-वर्गात ८१ जाती आहेत. त्यामध्ये ७३ मुस्लिम तर ८ हिंदू जाती आहेत. ब-वर्गातील ९८ जातींमध्ये ४५ मुस्लिम तर, ५३ जाती हिंदू आहेत. या एकूण १७९ जातींपैकी अनेक जातींच्या ओबीसी राज्याच्या सूचीतील समावेशाला उच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आहे. २००-२१ मध्ये पश्चिम बंगाल सरकारने ८७ जातींचा केंद्रीय सूचीमध्ये समावेश करण्याची शिफारस केली होती. त्यातील ८० जाती मुस्लिम व ७ जाती हिंदू होत्या. ही शिफारस केंद्रीय मागासवर्ग आयोगाने निकष सिद्ध होत नसल्याने फेटाळली. या जाती मागास असल्याचा सामाजिक-आर्थिक ताजा अहवाल राज्य सरकारने दिला नसल्याने या जातींचा समावेश करण्यात आला नाही. राज्य तसेच, केंद्राच्या सूचीमध्ये जातींचा समावेश करण्यासाठी राज्य सरकारला केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडे शिफारस करावी लागते.

# त्र्यंबकेश्वर इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये नाही

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाने पर्यावरण वाद्यांना धक्का



● नाशिक , प्रतिनिधी :


बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर जवळ ब्रह्मगिरी येथे मोठ्या प्रमाणात बांधकामे होऊ लागली आहे. या संदर्भात पुण्यातील राष्ट्रीय हरित लवादात दाखल याचिकेत जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला असून त्रंबकेश्वर गाव हे इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये येत नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच येथील बांधकामही त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या परवानगीनेच होत असल्याचे सांगितल्याने पर्यावरण वाद्यांना धक्का बसला आहे.

■ त्र्यंबकेश्वर परिसरातील ब्रह्मगिरी हे गोदावरी नदीचे उगमस्थान असून गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी बांधकामी सुरू लागले बऱ्याच ठिकाणी रिसॉर्ट होत आहे. त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने या बांधकामांना परवानगी दिली असली तरी या बांधकामांमुळे जैवविविधता नष्ट होऊ शकते. तसेच ब्रह्मगिरीला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे यापूर्वीही पर्यावरण कार्यकर्त्यांनी बांधकामे आणि उत्खननाला विरोध केला होता. माजी जिल्हाधिकारी सुरज मांढरे यांनी त्र्यंबकेश्वर परिसर इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर करणार असल्याची सांगितले होते. दरम्यान, या भागात बांधकामे सुरू झाल्यामुळे येथील सामाजिक कार्यकर्त्या ललिता शिंदे यांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांना संयुक्त पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश हरित लवादाने दिले होते.

■ हा अहवाल नुकताच सादर करण्यात आला असून यात त्र्यंबकेश्वर गाव हे इको सेंसिटिव्ह झोन मध्ये नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या परवानगीनेच बांधकामे करण्यात येत असल्याचे अहवालात नमूद केल्याने या बांधकामांना अभय मिळाले आहे. दरम्यान याचिकाकर्त्या ललिता शिंदे यांनी अहवाला विषयी नाराजी व्यक्त केली असून या संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# ४ महिन्यांत १८ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले

### मृत्यूनंतरही कुटुंबीयांचा मदतीसाठी संघर्ष



● वाशीम , प्रतिनिधी :

जिल्ह्यातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, नापीकी, कर्जबाजारी पणा तसेच पिकलेल्या मालाला योग्य भाव नसणे आदी कारणांनी शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण जिल्ह्यात मोठे आहे. सरत्या वर्षात ८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर चालू वर्षातील केवळ ४ महिन्यात १८ शेतकऱ्यांनी जीवन संपविले. मात्र यापैकी बहुतेक शेतकरी आत्महत्या अपात्रतेच्या फेऱ्यात अडकल्याने मृत्यू नंतर ही कुटुंबियांना मदत मिळत नसल्याचे भीषण वास्तव आहे.

दिवसेंदिवस शेती करणे शेतकऱ्यांना त्रासदायक होत आहे. वर्षभर घाम गाळून काळ्या मातीतून सोन पीकविणाऱ्या शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. जिल्ह्यात सिंचनाची फारसी सुविधा नसल्याने अनेकांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे. कधी ओला दुष्काळ तरी कोरडा, खर्च अधिक व उत्पन्न कमी, शेतमालाचे घसरलेले दर, कर्जबाजारी पणा अशा अनेक कारणामुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या होत आहेत. जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या वर्षात ८३ शेतकरी आत्महत्या ची नोंद करण्यात आली. यामधून केवळ २८ शेतकरी आत्महत्या पात्र आहेत तर ४६ शेतकरी आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. केवळ २७ आत्महत्या पीडित कुटुंबाना शासनाकडून मदत देण्यात आली आहे.

अपात्र शेतकरी आत्महत्या चिंताजनक

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील वारसांना मदत देण्यात येते , मात्र त्यासाठी ती आत्महत्या शासनाच्या नियमानुसार ‘पात्र’ असावी लागते. परंतु जिल्ह्यात झालेल्या बहुसंख्य आत्महत्या ह्या अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मयत होऊनही कुटुंबावर मदतीसाठी संघर्ष करावा लागत आहे.